# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 15th April 2025 ( No. of Pages 16 ) ( No : 07


# लढवय्या गुरुवर्य


**- प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


अन्याय निवारण करण्यासाठी विधिमय मार्गांचाच वापर केला पाहिजे व कोणत्याही परिस्थितीत अवैध मार्गांचा किंवा अपमार्गांचा वापर करू नये या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आज संघटितपणे न्यायालयात जाणे ही गोष्ट आता सर्वांनाच परिचयाची झालेली आहे. संलग्न महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील म्हणजे अशासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने शासनाच्या अन्याय निर्णयाविषयी न्यायालयात जावून न्याय मिळविला असेल तर राज्यकर्त्यांना एवढा राग येतो की, त्या व्यक्तीवर चौकशी समिती लावून त्या व्यक्तीचा छळ करणारे शासन निर्णय सहज निर्गमित होतात अशी उदाहरणे उपलब्ध आहेत.

**२.** अशा परिस्थितीत आपल्यावर होणाऱ्या अन्याय निवारणार्थ विधिमय मार्गाचा वापर म्हणून एकट्याने उच्च न्यायालयापर्यंत व सर्वोच्च न्यायालयापर्यंत संघर्ष करून शासनाची अन्याय कृती उद्ध्वस्त करणाऱ्या शासकीय सेवेतील एका अधिव्याख्यात्याने केलेला संघर्ष हा या विशेषांकाचा मुख्य विषय आहे. सत्तेच्या समीप असलेले लोक त्यांना पाहिजे तसे निर्णय सत्ताधाऱ्यांकडून करवून घेतात. हे दर्शविणारी मुबलक उदाहरणे या संघर्षात पहायला मिळतील.

**३.** राज्य पुनर्रचना झाली त्यावेळेला द्विभाषिक मुंबई राज्यामध्ये सत्तेच्या समीप असलेल्या लोकांनी या सत्तासमिपतेचा फायदा घेऊन आपल्याला अनुकूल असे लाभ पदरात पाडून घेण्याचा सपाटाच लावला. एका बाजूला विदर्भातून द्विभाषिकात गेलेले आणि दुसऱ्या बाजूला निजामाच्या राजवटीतून द्विभाषिकात गेलेल्या मराठवाड्यातील व विदर्भातील शासकीय अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांना अत्यंत वाईट परिस्थितीला तोंड द्यावे लागले. अशारितीने होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयापर्यंत एक एकट्याने संघर्ष करावा लागत असे. असा संघर्ष करून शासनातील विकृत शासननिर्णय उद्ध्वस्त करण्यात यश मिळविलेल्या एका लढवय्याची ही गोष्ट आहे. योगायोगाने अशा लढवय्या शिक्षकाचा एक विद्यार्थी म्हणून लागोपाठ सहा वर्षे धडे घेण्याची संधी मला माझ्या महाविद्यालयीन विद्यार्थी जीवनात प्राप्त झाली. या लढवय्या शिक्षकाचे नाव पद्माकर सिद्धनाथ काणे असे आहे.

**४.** त्यावेळेच्या द्विभाषिक मुंबई राज्याच्या लोकसेवा आयोगाकडून निवड होऊन राज्यशास्त्र या विषयाचे अधिव्याख्याता म्हणून अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात प्रा.प.सि.काणे यांची नियुक्ती झाली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शनात १९६६ पासून दुसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या महाराष्ट्रात लागू झाल्या. ५० टक्के शिक्षकांना ३००-६०० ही मूळ वेतनश्रेणी लागू झाली. उर्वरित २५ टक्के शिक्षकांना ४००-८०० अशी वरिष्ठ श्रेणी निश्चित झाली. आणखी २५ टक्के शिक्षकांना वरिष्ठ अधिव्याख्यात्यासाठीची ७००-११०० अशी वेतनश्रेणी निश्चित झाली. ७००-११०० ही वेतनश्रेणी पूर्णपणे सेवाज्येष्ठतेच्या आधारावर दिल्या जावी अशी ही व्यवस्था होती.

**५.** शासननिर्णयाप्रमाणे प.सि.काणे व बी.के.जोशी या दोन राज्यशास्त्राच्या अध्यापकांना केवळ सेवाज्येष्ठतेच्या आधारावर दिली जाणारी वरिष्ठ वेतनश्रेणी (७००-११००) मिळणे आवश्यक होते. पण तसे झाले नाही. मुंबईमध्ये सत्तेच्या समीप असलेल्या दोन इतिहासाच्या अधिव्याख्यात्यांना ज्येष्ठतेच्या आधारावर इतिहास या विषयात वरिष्ठ अधिव्याख्याता ही वेतनश्रेणी मिळणे शक्य नव्हते. राज्यशास्त्राच्या २५ टक्के पैकी दोन जागा इतिहासाच्या प्राध्यापकांना देण्यात आल्या. त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १५ जानेवारी १९७० रोजी निर्गमित करण्यात आला. या शासननिर्णयाला प्रा.प.सि.काणे व प्रा.बी.के.जोशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर आवाहन दिले. (Civil Application No. 695 of 1971)

**६.** उभय बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११ मार्च १९७५ रोजी या प्रकरणी निर्णय दिला. शासननिर्णयातील राज्यशास्त्राची जागा इतिहासाच्या शिक्षकाला देण्याची कृती उच्च न्यायालयाने रद्दबातल केली. या निर्णयातील आदेशाचा भाग पुढीलप्रमाणे :-

"The Petition is thus allowed. The result will be that the petitioners will be entitled to be considered for promotion to Class I posts in the Department of Political Science, and the seniority of the respondents Nos. 3 to 5 will be considered in the seniority list relating to the Department of History."

## Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.04.2025**

**From :**
**Dr.Nitin C. Kongre**
Secretary, NUTA
Plot No. 144, Gayatri Nagar,
Behind IT Park, Nagpur-440022

**To,**
All the members
of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.Nitin C. Kongre,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting 12.00 Noon on Sunday, the 29th June 2025***

**७.** इतिहासाच्या त्या दोन प्राध्यापकांना देण्यात आलेले लाभ तसेच चालू राहावे म्हणून राज्यशासनाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्यशासनाने अशी भूमिका मांडली की, १९६३ ते १९६७ या काळामध्ये इतिहास व राज्यशास्त्र या विषयांची संयुक्त सेवाज्येष्ठता यादी अस्तित्वात होती आणि त्यामुळे या दोनही विषयातील शिक्षकांची संख्या गृहीत धरून २५ टक्के वरिष्ठ श्रेणी देतांना ती इतिहास या विषयाच्या शिक्षकाकडे सेवाज्येष्ठतेच्या आधारावर गेलेली आहे आणि त्यामध्ये काही चुकीचे नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक ११ जानेवारी १९७७ रोजी निर्णय दिला व राज्यशासनाचे हे म्हणणे पुढील शब्दात मान्य केले. :-

"The combined seniority list was therefore fully authorised, and there was nothing wrong if it formed the basis of the promotions which were given to the persons mentioned above. We have no doubt that the High Court did not read the relevant document carefully and that was why it arrived at a contrary conclusion."

मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द ठरविला. तो पुढील शब्दात :-

"The appeals are allowed, the impugned judgement of the High Court dated March 11, 1975 is set aside and the Writ Petition is dismissed. The State of Maharashtra will pay the costs of respondents Nos. 1 and 2 (Balchandra K. Joshi and Padmakar Sidharath Kane) in Special Leave Petition No. 915 of 1976, as directed by this Court on October 8, 1976."

**८.** सन १९६३ ते १९६७ या काळामध्ये राज्यशात्र व इतिहास या विषयांची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी अस्तित्वात होती असे शपथपत्र मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतरसुद्धा राज्यशास्त्र या विषयाचे प्रा.पी.एस.काणे व प्रा.बी.के.जोशी यांच्या पेक्षा कनिष्ठ असलेले प्रा.पी.एल.मिश्रा यांना दिनांक ०१.०४.१९६६ पासून ७००-११०० च्या वेतनश्रेणीत टाकणारा शासननिर्णय निर्गमित झाला. त्याच आधारावर श्री.पी.एल.मिश्रा यांना राजाराम कॉलेजचे प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक देण्याचा आदेश काढण्यात आला. त्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य आणखीच वाढले.

**९.** नियमाप्रमाणे न्याय्य वागणूक न देता सत्तेच्या समीप असलेल्या लोकांना लाभ देण्याच्या हेतूने नव्याने महाराष्ट्रात आलेल्या भागातील शिक्षकांना नियमबाह्य वागणूक द्यायची व तक्रार केली तर मूळ नियमच बदलवून टाकायचा. हा जो प्रकार प्रा.काणे यांच्या बाबतीत झाला तसाच प्रकार विदर्भातील सुप्रसिद्ध साहित्यिक व महानुभव वाङ्मयाचे अखिल भारतीय स्तरावरील संशोधक म्हणून ख्याती प्राप्त असलेले डॉ. व्ही.बी. ऊर्फ भाऊसाहेब कोलते यांच्या बाबतीत सुद्धा राज्य पुनर्रचनेच्या वेळी घडल्याचे उदाहरण तपशीलवार लक्षात घेणे आवश्यक आहे. राज्य पुनर्रचनेच्या वेळी नागपूर महाविद्यालयामध्ये प्राचार्य असलेले श्री.चतुर्वेदी यांनी मध्यप्रदेशात जाण्याचा पर्याय निवडल्यामुळे त्या महाविद्यालयाच्या रिकाम्या झालेल्या प्राचार्यपदी प्रभारी प्राचार्य म्हणून डॉ.भाऊसाहेब कोलते यांची नेमणूक करण्यात आली. वर्ष दीड वर्षे पर्यंत प्रभारी प्राचार्य या नात्याने उत्तमरितीने कार्यभार सांभाळणाऱ्या डॉ.भाऊसाहेब कोलते यांना त्यानंतर एका विचित्र प्रसंगाला तोंड द्यावे लागले. नियमाप्रमाणे शासकीय सेवेत त्यांच्या पेक्षा बारा वर्षांनी कनिष्ठ असलेल्या मुंबई येथील एलफिस्टन महाविद्यालयातील डॉ.ढेकणे यांची नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नेमणूक करण्यात आली.

**१०.** डॉ.ढेकणे यांची प्राचार्य म्हणून नेमणूक करणारे आदेश नागपुरात पोहचल्यानंतर संबंध विदर्भभर मोठ्या प्रमाणात खळबळ माजली. वृत्तपत्रांतून सुद्धा हे प्रकरण त्यावेळेला फार मोठ्या प्रमाणामध्ये गाजले. विशेषतः विदर्भातील वृत्तपत्रांनी मुंबई शासनाचे अक्षरशः वाभाडे काढले. त्यावेळेच्या परिस्थितीचे "अजुनि चालतोचि वाट" या आपल्या आत्मचरित्रामध्ये डॉ.भाऊसाहेब कोलते यांनी केलेले वर्णन मी इथे शब्दशः उधृत करीत आहे. :-

"प्राचार्य पदावरून मला दूर करून त्या जागी मुंबईहून डॉ.ढेकणे यांना पाठविले असल्यामुळे मला वाईट वाटणे साहजिक होते, पण शासनाच्या या कारवाईमुळे माझ्या अनेक मित्रांनाही दुःख झाले. त्यांची सहानुभूतीपर पत्रे आली. माझ्या काही विदर्भवादी स्नेह्यांनी तर मला टोमणेही दिले."

"भाऊसाहेब, आम्ही म्हणत होतो ना, की महाराष्ट्रातील ही माणसे विदर्भाला गिळंकृत करतील आणि आपले वर्चस्व सर्वत्र स्थापन करतील. म्हणून तर आम्हाला अजूनही वाटते की विदर्भ हा स्वतंत्र वेगळा प्रांत असला पाहिजे. आता आला ना तुम्हाला अनुभव? अहो, हा नुसता आरंभ आहे. ही माणसे पुढे काय काय करतील ते आता पाहातच राहा. तुम्ही संयुक्त महाराष्ट्राचे - छे छे, 'महाराष्ट्रा'चे कैवारी आहात आणि पहिला आघात तुमच्यावर झाला. घ्या आता." *(पृष्ठ ४७०)*

**११.** बारा वर्षांनी कनिष्ठ असलेल्या मुंबईच्या एका प्राध्यापकाला प्राचार्य म्हणून डॉ.भाऊसाहेब कोलते यांच्या सारख्या नामवंत साहित्यिकाला बाजूला सारून नेमल्या जाते. यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत होती. नागपूर येथील 'राष्ट्रदूत' या साप्ताहिकाने याबाबतीत लिहिलेल्या लेखातील एक उतारा त्याच्या मथळ्यासह शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"द्विभाषिकाच्या पेटाऱ्यामधील सं. महाराष्ट्रीय नागाने घेतलेला बळी.**

नागपंचमी, नागपूर

विदर्भातील सुप्रसिद्ध साहित्यिक व महानुभाव वाङ्मयाचे अखिल भारतामधील अधिकारी डॉ.विष्णु भिकाजी ऊर्फ भाऊसाहेब कोलते हे मागील सुमारे दोन वर्षांपासून नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम पाहत होते. पण ज्या अवाढव्य द्वैभाषिक मुंबई राज्यात संयुक्त महाराष्ट्राच्या कोब्रा नागाचा विळखा बसला आहे, त्याने सरतेशेवटी डॉ.भाऊसाहेब कोलतेच्या प्राचार्य-पदाला डंख मारला व त्याचा फन्ना उडविला. डॉ.कोलते यांच्या विद्वत्तेच्या, पांडित्याच्या संशोधनाच्या अगर अभ्यासाच्या तोलाचा, योग्यतेचा माणूस अखिल मराठी मुलुखात मिळायचा नाही. परंतु या द्वैभाषिकाच्या पेटाऱ्यामधील महाराष्ट्रीय सापाने त्यांना दंश केला आहे. महाराष्ट्रातील कोणी 'ढेकणे' हे प्राचार्य म्हणून नागपूर महाविद्यालयात येणार आहेत. महाराष्ट्रातील मग तो डास असो, उ असो, ढेकूण असो, तो प्राचार्य होण्यास योग्य ठरतो, परंतु विदर्भातील 'विष्णु' असला तरी त्यास खारीज करण्यात येते ! ही महाराष्ट्रीय चाल आहे. डॉ.वि.भि. कोलत्यासारख्या सन्मान्य अशा तगड्या विद्वानाची ही कथा आहे. याशिवाय छोट्या छोट्या कर्मचाऱ्यांच्या, नोकऱ्यांच्या करूण कहाण्या तर असंख्य आहेत. 'राष्ट्रदूता'कडे ही सरकारी कर्मचारी मंडळी पत्रावर पत्रे लिहीत असतात, पण त्यावर त्यांची अधोरेखांकित ओळ असते की 'यास प्रसिद्धी देऊ नये. कारण आम्ही सरकारी नोकर आहोत! हे केवळ तुमच्या अवलोकनार्थ आहे' या त्यांच्या सूचनेमुळे दुर्दैवाने, आम्हास त्या करुण कहाण्यांना वाचा फोडता येत नाही. वाचा फुटण्यापूर्वीच हे वैदर्भीय कर्मचारी महाराष्ट्राच्या बकासुराला बळी पडलेले असतात. द्वैभाषिकामध्ये 'गुजरात' समाविष्ट आहे. त्यामुळे आम्हाला कसलाच छळ झालेला नाही. जो काही छळ होत आहे व होणार आहे तो या महाराष्ट्रीय मवाली राज्यकर्त्यांचा! आमचेकडचे मंत्री शुद्ध शिखंडी आहे आणि असे पाच शिखंडी एकत्र झाले तरी काय निष्पन्न होणार आहे? पण या सर्व प्रकरणावरून मुंबई द्वैभाषिकापेक्षाही संयुक्त महाराष्ट्राचा राक्षस केवढा क्रूर व अक्राळ-विक्राळ आहे याची आपणास सहज कल्पना येते.

विदर्भामधील सरकारी नोकरांना या आठ जिल्ह्यांच्या घटक विभागात तरी त्यांच्या सिनिऑरिटीप्रमाणे बढती मिळाली पाहिजे. पुण्यामुंबईच्या सरकारी नोकरांचा भरणा इकडे व्हावयास नको. परंतु सत्तेने पिसाळलेल्या राज्यकर्त्यांना जोपर्यंत आपण ताळ्यावर आणणार नाही तोपर्यंत त्यांचे डोळे उघडणार नाहीत व लंब कर्ण ऐकावयास तयार होणार नाहीत. हा नियम कसा मोडणार आहे?" *(पृष्ठ ४७१)*

**१२.** राज्य पुनर्रचनेनंतर निरनिराळ्या विभागातून महाराष्ट्रात समाविष्ट झालेल्या महाविद्यालयीन प्राध्यापकांचे निरनिराळ्या संवर्गात समावेशन करतांना त्यावेळेच्या मुंबई शासनाने घालून दिलेल्या नियमांचा भंग करण्याची ही कृती होती. डॉ.भाऊसाहेब कोलते यांनी विधिमय मार्गांनी या अन्यायाला विरोध करण्याचा निर्णय घेतला. राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.यशवंतरावजी चव्हाण हे नागपूरला आले असतांना भेट घेऊन त्यांच्या कानावर हा प्रकार त्यांनी घातला. मा.मुख्यमंत्र्यांशी झालेल्या या भेटीची तपशीलवार माहिती डॉ.भाऊसाहेब कोलते यांनी त्यांच्या आत्मचरित्रामध्ये नमूद केलेली आहे. ती शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"एक तर विदर्भाच्या व पूर्वीच्या मुंबई प्रांताच्या शिक्षण खात्यातील प्राध्यापकांचे समावेशन व एकात्मीकरण पूर्ण झालेले नव्हते. त्या संबंधीचा कोणताही शासकीय निर्णय अजून प्रसिद्ध झाला नव्हता. हे समावेशन व एकात्मीकरण केल्यावर सेवाज्येष्ठता ठरवून, त्यावर संबंधित व्यक्तींचे काही आक्षेप असल्यास ते मागवण्यात आले नव्हते आणि तरीही ह्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. मुंबई शासनाची ही मनमानी होती. मला आठवते, त्यावेळचे मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण नागपूरला आले असताना मी त्यांची भेट घेतली. ही भेट मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानात झाली. माझी चिठ्ठी गेल्यावर ते बाहेर व्हरांड्यात आले. खुर्चीवर बसून त्यांनी सिगरेट पेटवली आणि झुरके घेत घेत ते माझे म्हणणे ऐकून घेऊ लागले.

मी माझे प्रकरण त्यांच्यासमोर मांडले, तेव्हा ते म्हणाले,

“कोलते, समावेशन व सेवाज्येष्ठता जी ठरविली आहे ती अजून अंतिम नाही.”

मी म्हटले, “सेवाज्येष्ठता अजून अंतिम नाही तर माझ्यापेक्षा डॉ.ढेकणे यांना ज्येष्ठ ठरवून त्यांना नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नेमण्याची घाई करण्याचे कारण काय?”

यावर यशवंतरावांनी काहीही उत्तर दिले नाही. त्यांना मी असा प्रश्न विचारल्याने ते दुखावल्यासारखे भासले. “मला न्याय मिळावा.” अशी पुनश्च विनंती करून मी तेथून निघालो.” *(पृष्ठ ४७२)*

**१३.** राज्य पुनर्रचना झाल्यावर पूर्वी मध्यप्रदेशात असलेला विदर्भ व निजामाच्या राजवटीत असलेला मराठवाडा हे भाग मुंबई प्रांताला जोडण्यात आले. त्यामुळे तेथील व जोडण्यात आलेल्या इतर विभागातील सर्व खात्यातील सेवकवर्ग मुंबई प्रांताकडे नेमून देण्यात आला. त्यांचे व मुंबई प्रांतातील सेवकवर्गाचे समावेशन करून एकात्मता साधण्यासाठी मुंबई शासनाने काही नियम तयार केले. ते त्यांच्या ‘राजकीय सेवा विभागाने’ १८ ऑक्टोबर १९५७ रोजी प्रसिद्ध केलेल्या शासननिर्णयात सविस्तर देण्यात आलेले आहेत. त्याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. या शासननिर्णयाच्या दुसऱ्या भागात सेवाज्येष्ठतेसंबंधीचे नियम आलेले आहेत. त्यातील ७ व्या नियमाच्या दुसऱ्या ‘परंतुका’त असा दंडक घालून दिलेला आहे की, **“एखाद्या श्रेणीतील अस्थायी सेवकांनी त्या श्रेणीत स्थानापन्न म्हणून तीन वर्षे सतत काम केलेले नसेल तर, ज्या श्रेणीतील स्थायी पदावर त्यांची कायम नियुक्ती झाली असेल त्या श्रेणीतील सर्व सेवकांबरोबर त्यांची सेवाज्येष्ठता ठरविण्यात यावी.**” हे महत्त्वाचे परंतुक असून त्या परंतुकामुळेच पुढे ‘महाभारत’ घडले.

**१४.** मध्यप्रदेश शासनाने प्रथम श्रेणीत डॉ.कोलते यांची नियुक्ती दि. २ जुलै १९५६ रोजी केली होती. तर डॉ.ढेकणे यांची मुंबई शासनाने प्रथम श्रेणीत नियुक्ती दि. २९ ऑक्टो. ५४ रोजी केली होती. राज्यपुनर्रचनेच्या १ नोव्हे. १९५६ या तारखेपर्यंत या दोघांचीही पहिल्या श्रेणीत (BES Class One) तीन वर्षे पूर्ण झालेली नव्हती. हे दोघेही पहिल्या श्रेणीत ‘स्थायी’ नव्हते. म्हणून दोघांचीही सेवाज्येष्ठता दुसऱ्या श्रेणीत (BES Class Two) स्थायी झालेल्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर करण्यात येणे आवश्यक होते. मध्यप्रदेशात असताना डॉ.कोलते दुसऱ्या श्रेणीत दिनांक २१ ऑगस्ट १९३१ पासून तो ३१ ऑक्टो. ५६ पर्यंत म्हणजे एकूण २५ वर्षे सतत ‘स्थायी’ म्हणून काम करीत होते, तर मुंबई शासनातील दुसऱ्या श्रेणीत डॉ.ढेकणे दि. २० डिसें. १९४३ पासून तो २१ ऑक्टो. ५६ पर्यंत, म्हणजे एकूण १३ वर्षे ‘स्थायी’ म्हणून काम करीत होते. अर्थात, त्या श्रेणीत डॉ.ढेकणे यांच्यापेक्षा १२ वर्षांनी डॉ.कोलते ज्येष्ठ होते. असे असूनही, या ‘परंतुका’कडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून, केवळ प्रथम श्रेणीतील सेवाकालाच्या आधारावर मुंबई शासनाकडून डॉ.ढेकणे यांना सेवाज्येष्ठता देण्याची मनमानी करण्यात आली होती.

**१५.** डॉ.भाऊसाहेब कोलते यांनी या अन्यायाविरुद्धचे निवेदन शासनाकडे पाठविले. आपल्या निवेदनाच्या प्रती विदर्भातील सर्व मंत्री व लोकप्रतिनिधींना पाठविल्या होत्या. **त्यांचे एक विद्यार्थी, विधानमंडळ सदस्य व विदर्भ प्रदेश काँग्रेस कमेटीचे कार्यवाह श्री.प्र.ना.खोडे यांनी मा.मुख्यमंत्र्यांना व शिक्षण विभागाला स्वतःच्या विनंतीपत्रासह डॉ.कोलते यांचे निवेदन पाठविले.** त्या निवेदनामुळे शिक्षण खात्यात चांगलीच खळबळ झाली. आपलेच बरोबर आहे असा हट्ट धरून बसलेल्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी वेगळाच डाव रचला. भाऊसाहेब कोलते यांना नागपूर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य नेमले तेव्हा अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातील गणित विषयाचे प्राध्यापक श्री.एन.ए.शास्त्री यांनी “आपण कोलते यांच्यापेक्षा सेवाज्येष्ठ आहोत” असे अनेक महिन्यांपूर्वी दिलेले निवेदन उकरून काढले व नागपूर महाविद्यालयात गणित हा विषय नसतांना तेथे श्री.शास्त्री यांना प्राचार्य म्हणून नेमल्याचा आदेश दिनांक ११ डिसेंबर १९५८ रोजी काढला.

**१६.** सुडबुद्धीची ही कारवाई एवढ्यावरच थांबली नाही तर सेवाज्येष्ठता ठरविणारा १८ ऑक्टोबर १९५७ चा मूळ शासननिर्णय होता त्यामध्ये दुरुस्ती करणारा एक शासननिर्णय दिनांक २७ नोव्हेंबर १९५८ रोजी प्रसिद्ध केला. यात पूर्वीच्या शासननिर्णयातील ७ व्या नियमाचे महत्त्वाचे ‘परंतुक’ (Proviso), की ज्याच्या आधारावर भाऊसाहेब कोलते यांनी त्यांच्या सेवाज्येष्ठतेचा अधिकार प्रतिपादन केला होता, तेच पूर्णपणे वगळण्यात आले. श्री.खोडे यांनी मुख्यमंत्र्यांना ता. २८ सप्टेंबर रोजी जे पत्र लिहिले होते, त्यानंतरची ही कारवाई आहे. या शासननिर्णयात असे नमूद होते की,

“.....the question of fixation of seniority of Dr.V.B.Kolte in B.E.S. Class I (Collegiate Branch) vis-a-vis Dr.B.R.Dhekney was carefully examined in this Department.....”

या ‘काळजीपूर्वक केलेल्या परीक्षणातून’ निष्पन्न काय झाले? तर पूर्वीचा शासननिर्णय ‘दुरुस्त’ करून, त्यातील ७ व्या नियमातील ‘परंतुक’ वगळून राहिलेल्या नियमानुसार डॉ.ढेकणे हेच कसे ज्येष्ठ ठरतात, हे खोडे यांना कळविले. आणि सोबत ‘दुरुस्ती’चा तो शासननिर्णय जोडला.

**१६.१** श्री.प्र.ना.खोडे हे सत्तारूढ पक्षाचे विधानमंडळ सदस्य होते. नियमानुसार डॉ.भाऊसाहेब कोलते यांना वागूणक दिली जात नाही अशा तक्रारीचे निवेदन मा.मुख्यमंत्र्यांना सादर केले तर शासनाने मूळ नियमच बदलण्याचा निर्णय घेतला. तसे खोडे यांना कळविले. श्री.प्र.ना.खोडे यांनी हा वृत्तांत भाऊसाहेब कोलते यांना दिनांक २२ डिसेंबर १९५८ रोजी पत्र लिहून कळविला. त्यांचे पत्र भाऊसाहेबांनी आपल्या आत्मचरित्रात (पृष्ठ ४७४) उधृत केलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**“P.N.Khode**
M.A. LL.B., Advocate
Ramdaspeth, Akola (Vidarbha)
Date : 22.12.1958

**पूज्य भाऊसाहेब,**

आपल्या बाबतीत ज्या एक एक घटना घडत आहेत त्या पाहून मन अधिकाधिक विषण्ण होते. गेल्या १९ तारखेस आपण C.M. ना विमानतळावर निरोप दिला. नंतर accident झाला. त्यामुळे ते मेलने गेले. मीही त्याच गाडीने गेलो, त्यामुळे गाडीतही बोलणे झाले. ता. २० ला घरी आल्यावर मला एक शिक्षण खात्याकडून पत्र आले. आपलेबद्दल C.M. ला ता. २२.०९.१९५८ ला मी जे पत्र लिहिले त्याचे ते उत्तर आहे.

G.R. dated 18.10.1957 च्या rule 7 च्या proviso च्या जोरावर आपली केस आपण मांडत होतो. तेव्हा सरकारने दुसरा एक G.R. ता. २७.११.१९५८ ला काढला व ह्या G.R. ने ता. १८.१०.१९५७ चा G.R. दुरुस्त केला व ह्या दुरुस्ती अन्वये Rule 7 चा प्रोव्हिजो गाळून टाकला व ह्या दुरुस्तीला retrospective effect दिला. हे वाचून मी थक्कच झालो. माझे डोके शांत होण्यास १ दिवस लागला. नंतर संथ डोक्याने मी C.M. ला पत्र लिहिले. सोबत कागदपत्रांच्या नकला पाठविल्या. त्याची संपूर्ण प्रत सोबत जोडत आहे. तूर्त हे सर्व Confidential समजावे व त्याची वाच्यता कोठेही करू नये. मी ता. १ ला नागपूरला येत आहे. तेव्हा भेटीनच.

श्री.नाईक व तिरपुडे यांनाही आज लिहित आहे.

आपला नम्र
**प्र.ना.खोडे”**

**१७.** या दुरुस्तीनंतर तीव्र संघर्ष करण्याचा निर्णय डॉ.भाऊसाहेब कोलते यांनी घेतला व नवीन पण बिनतोड असा कायदेशीर मुद्दा पुढे केला. तो असा की, सेवाज्येष्ठता ठरविण्यासंबंधीचा मूळ शासननिर्णय “with the approval of Government of India” काढण्यात आला होता. त्यात दुरुस्ती करताना मुंबई शासनाने केंद्र शासनाची पूर्वसंमती मिळवणे अवश्य होते. ती मिळविल्याचे ‘दुरुस्ती’च्या शासन निर्णयावरून दिसून येत नाही. त्यामुळे हा दुरुस्तीचा निर्णयच मुळात रद्द होऊ शकतो. अशा या वादग्रस्त ‘दुरुस्ती’च्या आधारे डॉ.ढेकणे यांना सेवाज्येष्ठता देऊन त्यांना प्राचार्यपद देण्याचा अट्टाहास करणे बरोबर नाही असा तो मुद्दा होता.

**१८.** समावेशनाचा मूळ शासननिर्णय केंद्र शासनाच्या मान्यतेने काढला होता तेव्हा त्यात दुरुस्ती करणारा शासननिर्णय केंद्राच्या मान्यतेशिवाय काढणे हे पूर्णपणे बेकायदेशीरपणाचे आहे हा मुद्दा इतका बिनतोड होता की त्याचा शासनातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर इष्ट तो परिणाम घडून आला. त्यामुळेच नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्यपद डॉ.कोलते यांना पुन्हा देण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागला. या बाबतीत शासनाने दिनांक २२ जानेवारी १९५९ रोजी काढलेला शासननिर्णय पुढीलप्रमाणे होता :-

**“Resolution :** Orders issued in paragraph 2 of Government Resolution, Education Department, No. S.C.P. 1058-D, dated the 11th December 1958, so far as they relate to the appointment of Shri N.A.Shastri as Principal of the Nagpur Mahavidyalaya, Nagpur, should be treated as cancelled.

2. Dr.V.B.Kolte, Reader in Marathi, Nagpur Mahavidyalaya, Nagpur, is appointed to Officiate as Principal of the same

college, with effect from the date he takes over charge of the post, vice Dr.B.R.Dhekney transferred.

(Mohd. Abdulla)
Joint Secretary to Government."

**१९.** डॉ.भाऊसाहेब कोलते यांच्यावरील अन्यायाचे हे विवेचन म्हणजे कथेमध्ये आडकथा आल्यासारखे वाटेल ही गोष्ट मान्यच करावी लागेल. पण मुंबई येथे मंत्रालयात आधीपासून मुक्कामी असलेल्यांनी सत्तेच्या समीपतेचा लाभ घेऊन विदर्भ व मराठवाड्यातील शासकीय सेवक व अधिकारी जे महाराष्ट्रात समाविष्ट झाले त्यांना विविध प्रकारचे अन्याय सहन करायला लावले याची अनेक उदाहरणे माझ्या दप्तरी आहेत. त्यापैकी एक नामवंत उदाहरण म्हणून डॉ.भाऊसाहेब कोलते प्रकरणाचा दाखला देण्याचा मोह मला आवरता आला नाही. या प्रकरणाचा दाखला देण्याचे आणखी एक कारण असे की, डॉ.भाऊसाहेब कोलते यांनी ज्या आक्रमकपणे या अन्यायाचा प्रतिकार केला त्यापेक्षा जास्त आक्रमकपणे प्राचार्य प.सि.काणे यांनी आपल्यावर झालेल्या अन्यायाचा प्रतिकार केला. जास्त आक्रमकपणे म्हणण्याचे कारण असे की, तीन वेळा उच्च न्यायालयात व एक वेळ सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी त्यांना धाव घ्यावी लागली होती.

**२०.** शासकीय सेवेत असलेले प्रा.प.सि.काणे व प्रा.बी.के.जोशी या दोनही अधिव्याख्यात्यांनी आपल्यावर झालेल्या अन्यायाचे प्रतिपादन करणारे निवेदन शासनाकडे पाठविले व त्या निवेदनाच्या प्रती काही लोकप्रतिनिधींना सुद्धा दिल्या. या बाबतीत मी केलेला पहिला प्रयत्न ज्या कारणामुळे अस्वीकृत झाला, त्याच कारणासाठी यापूर्वी काही लोकप्रतिनिधींनी याबाबत केलेला प्रयत्नसुद्धा अस्वीकृत झाला असावा असे म्हणता येईल. विधानमंडळ सदस्य होण्यापूर्वी राज्यशास्त्राचा विद्यार्थी व त्यानंतर शिक्षक या नात्याने प्रा.काणे सरांच्या कडे माझ्या नियमित बैठका होत असत. विधानपरिषद सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर या बैठकांचे प्रमाण मार्गदर्शनार्थ बरेच वाढले होते. सन १९८१ मध्ये मी विधानपरिषद सदस्य होण्यास एक वर्ष सुद्धा पूर्ण झालेले नव्हते. अशा वेळी एका अनौपचारिक गप्पांच्या बैठकीत प्रा.काणे सरांनी झालेल्या उपरोक्त प्रकाराची तपशीलवार माहिती मला दिली. ती ऐकून मला आश्चर्य वाटले.

**२१.** इतिहास व राज्यशास्त्र या दोन विषयांची संयुक्त सेवाजेष्ठता यादी सन १९६३ ते १९६७ या काळात अस्तित्वात होती असे शपथपत्र मा.सर्वोच्च न्यायालयात शासन दाखल करते, त्या आधारावर सर्वोच्च न्यायालयात अनुकूल निर्णय मिळवून घेते पण प्रत्यक्षात त्याप्रमाणे कारवाई मात्र करीत नाही. या गोष्टीचे मला आश्चर्य वाटले. आपण विधानमंडळ सदस्य म्हणून याबाबतीत काही प्रयत्न करावा अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण झाली. याबाबतच्या सर्व कागदपत्रांचे मी नीट अवलोकन केले व तारांकित प्रश्नाच्या रूपाने हा प्रश्न उपस्थित करावा असे ठरविले. प्रश्न स्वीकृत करण्याच्या किंवा अस्वीकृत करण्याच्या ज्या विविध अटी आहेत त्यामध्ये "it must be a matter of sufficient public importance" (तो विषय पुरेसा सार्वजनिक महत्त्वाचा असला पाहिजे) अशी एक अट होती. शिक्षण विभागाने विधानमंडळ सचिवालयाला असे कळविले की, "हा प्रश्न फक्त दोन अधिव्याख्यात्यांशी संबंधित आहे म्हणजे पुरेसा सार्वजनिक महत्त्वाचा नाही. म्हणून तो प्रश्न स्वीकृत केला जाऊ नये." विधानमंडळ सचिवालयाने (मा.सभापतींनी) त्या कारणावरून माझा याविषयीचा प्रश्न अस्वीकृत केला.

**२२.** प्रश्न अस्वीकृत करण्याच्या या निर्णयामुळे नाउमेद न होता मी मा.सभापतींकडे पुनर्विचारासाठी अपील दाखल केले. या अपीलामध्ये माझे म्हणणे असे होते की, "मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये शपथपत्रावर संयुक्त सेवाज्येष्ठता यादी होती" असे नमूद करावयाचे त्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. पण त्यानंतर राज्यशासनाने अंमलबजावणी करतांना त्या निर्णयाच्या विरोधात कारवाई केलेली आहे." एका बाजूला मा.सर्वोच्च न्यायालय व दुसऱ्या बाजूला राज्यशासन ह्या घटनात्मक यंत्रणा आहेत. राज्यशासनाने विपरित वर्तन केल्यामुळे "it is a matter of highest Constitutional importance" असे मी माझ्या निवेदनामध्ये प्रतिपादन केले होते. मा.सभापती श्री.जयंतराव टिळक यांनी माझे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळ दिला. मा.सभापतींच्या दालनात विधानमंडळाचे प्रधान सचिव सुद्धा उपस्थित होते. तपशीलवार चर्चा झाली व त्यानंतर घटनात्मक दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळे तो स्वीकृत व्हावा असे आदेश मा.सभापतींनी दिले.

**२३.** "**राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे वेतननिश्चिती करण्याबाबत**" या विषयावरील आमचा स्वीकृत झालेला तारांकित प्रश्न क्रमांक १३५५१ हा बुधवार, दिनांक ३१ मार्च १९८२ रोजीच्या विधानपरिषदेच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. आज शिक्षणखात्याच्या प्रश्नांना राज्यमंत्री श्री.विलासराव देशमुख उत्तर देणार होते. सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास सुरू होण्यापूर्वी मा.शिक्षण राज्यमंत्र्यांनी निरोप पाठवून मला त्यांच्या दालनात बोलाविले व याबाबतीत माझ्याशी चर्चा केली. प्रश्न समजावून घेतला. मी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले शपथपत्र व त्यावर आधारित सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व शिक्षण खात्याने प्रत्यक्ष शासननिर्णय काढतांना केलेली कृती ही त्यांच्या तपशीलवारपणे लक्षात आणून दिली. त्यावर मा.राज्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी असे उद्‌गार काढले की, "आपण त्यातून मार्ग काढू." ते पुढे असेही म्हणाले की, "मराठवाड्यातील शासकीय महाविद्यालयातूनसुद्धा अशा तक्रारी आहेत. निझामाच्या राजवटीत बहुतेक माध्यमिक शाळा ह्या सरकारच्या होत्या आता त्या सर्व महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित आलेल्या आहेत. तेथूनसुद्धा अशा अनेक तक्रारी आहेत. त्यातून मार्ग काढावाच लागेल."

**२४.** आमच्या तारांकित प्रश्न क्रमांक १३५५१ च्या "शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची संयुक्त ज्येष्ठता यादी १९६३ ते १९६७ या कालावधीत शासकीय निर्णयानुसार अस्तित्वात होती, हे खरे आहे काय;" या प्रश्न भाग एकला शिक्षणमंत्र्यांच्या वतीने राज्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी "होय" असे उत्तर दिले होते. "खरे असल्यास, सर्वोच्च न्यायालयामध्ये अशी संयुक्त ज्येष्ठता यादी त्या कालखंडात होती असे शासनाने नमूद करुनसुद्धा १ एप्रिल १९६६ पासून ज्येष्ठतेच्या आधारावर ७००-११०० या वेतनश्रेणीत स्थान निश्चिती करताना मात्र या संयुक्त यादीतील राज्यशास्त्राच्या काही ज्येष्ठ प्राध्यापकांची ज्येष्ठता दुर्लक्षित करण्यात आली अशी तक्रार राज्यशास्त्राच्या काही प्राध्यापकांनी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय;" या प्रश्न भाग दोनला सुद्धा एका शब्दात "होय" असे उत्तर दिले होते. "हे खरे असल्यास, सदहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे?" या प्रश्न भाग तीनला "त्यावर विचार चालू आहे" असे उत्तर देण्यात आले होते.

**२५.** "त्यावर विचार चालू आहे" अशा प्रकारचे विभागाकडून आलेले उत्तर आजच्या प्रश्नाच्या भाग तीनमध्ये नमूद होते. अनुपूरक चर्चा सुरू झाली तेव्हा प्रश्नाचा प्रवास कसा पुढे नेता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करून पाहिला. त्यात बऱ्यापैकी यश मिळाले. अनुपूरक चर्चेमध्ये प्रश्नावर विचार चालू आहे हे पारंपारिक उत्तर आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या शपथपत्रावर आधारित निर्णय तेथे झाला असल्यामुळे आता काही विचार करून वेगळा निर्णय घेता येणार नाही. ७००-११०० ही वेतनश्रेणी सेवाज्येष्ठतेच्या आधारावर दिली पाहिजे असा तुमचा शासननिर्णय आहे. त्याप्रमाणे अनेकांना ती वेतनश्रेणी देण्यात आलेली होती त्यामुळे त्यावरसुद्धा वेगळा निर्णय घेता येणार नाही. मग आता विचार कशावर चालू आहे अशा अर्थाचा प्रश्न मी विचारला असता खुद्द मा.सभापतींनी "विचार चालू आहे" असे उत्तर दिलेले आहे. "विचार चालू नाही" असे उत्तर दिलेले नाही असे उद्‌गार काढले. ती चर्चा पुढीलप्रमाणे:-

"**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, प्रश्न क्रमांक एक व दोन यांची 'होय' अशा प्रकारची उत्तरे आहेत. परंतु तीनचे जे उत्तर आहे ते त्यावर 'विचार चालू आहे' असे आहे. अध्यक्ष महाराज, इतिहास आणि राज्यशास्त्र हे विषय एक केले, आमचे काही म्हणणे नाही. परंतु यामध्ये त्यांचा ज्येष्ठता क्रम डावलून जे खालचे लोक आहेत त्यांना प्रमोशन दिलेले आहे. तेव्हा शासनाचा विचार चालू आहे, तो कशावर चालू आहे?

**सभापती** : विचार चालू आहे असे उत्तर दिले आहे, विचार चालू नाही असे उत्तर दिलेले नाही."

**२६.** खरे म्हणजे या दोनही बाबतीत विचार करण्यासारखे काहीही शासनासाठी शिल्लक राहिलेले नव्हते. तरीही हा विचार केव्हा पूर्ण होईल? असे मी विचारले असता सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन हा विचार लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल असे उत्तर मा.राज्यमंत्र्यांनी दिले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, ही बाब खरे म्हणजे विचार करण्यासारखी नाही. तरीही मी असे विचारतो की, हा विचार केव्हा पूर्ण होईल?

**श्री. विलासराव देशमुख** : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन हा विचार लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल." येथेच त्या दिवशीची चर्चा संपली. त्या दिवशीच्या चर्चेचे शब्दशः अधिकृत प्रतिवेदन सोबत **सहपत्र : १** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**२७.** पुढच्या अधिवेशनात दिनांक ७ सप्टेंबर १९८२ रोजी "राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे वेतननिश्चिती

करण्याबाबत" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक १४१६८ हा सभागृहामध्ये उत्तरासाठी होता. विभागाकडून आलेले मूळ उत्तर निराशाजनक व अत्यंत प्रतिकूल होते. उत्तरामध्ये "शासकीय महाविद्यालयातून राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या काम करणाऱ्या प्राध्यापकांना सन १९६३ ते १९६७ या कालावधीतील ज्येष्ठता यादीप्रमाणे ७०० ते १,१०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय;" या प्रश्न भाग एकला मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी "नाही" असे उत्तर दिले होते. "असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;" या प्रश्न भाग दोनला "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर देण्यात आले होते. "निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग तीनच्या उत्तरामध्ये "**१९६३ पासूनची माहिती एकत्रित करावयाची असल्यामुळे काही काळ लागत आहे.**" असे उत्तर देण्यात आले होते. सत्ता-समिपता मंडळाचा विजय असो! असे म्हणण्याची वेळ आली. मूळ उत्तर **सहपत्र : २** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**२८.** मूळ उत्तरे ही दहा दिवस अगोदर विभागाकडून विधानमंडळ सचिवालयाकडे येतात. सभागृह सुरू होण्याच्या एक तास अगोदर त्यांची मुद्रित यादी सदस्यांच्या खणात टाकली जाते. मी जेव्हा मुद्रित यादीतील या प्रश्नाचे उत्तर पाहिले तेव्हा ते पूर्णपणे नकारार्थी असल्यामुळे मनाला खिन्नता आली. पण क्षणभरच. उत्तर पूर्णपणे नकारार्थी असेल तर शासनाच्या वर्तनातील फोलपणा, बेकायदेशीरपणा उघड करण्याच्या तयारीला लागणे हा प्रभावी उपाय असतो. इथे तर पूर्णपणे घटनाबाह्य वर्तन होते. भारतीय संविधानाच्या १२९ व्या कलमामध्ये "The Supreme Court shall be a Court of Record" असे सर्वोच्च न्यायालयाचे वर्णन करण्यात आले आहे. तेव्हा आता "Court of Record" म्हणजे काय? याचा प्रश्नोत्तराच्या रूपाने वर्गच घेण्याचे मी ठरविले. तत्कामी एक-एक दोन-दोन ओळींच्या लहान लहान अनुपूरक प्रश्नांचे मसुदे तयार करण्याचे काम सभागृहात माझ्या जागेवर बसून उत्साहाने सुरू केले. मात्र सभागृह सुरू झाल्यानंतर माझ्या या उत्साहावर पाणी ओतले गेले.

**२९.** मला असे कळले की, सभागृह सुरू होण्यापूर्वी संबंधित मंत्र्यांची व अधिकाऱ्यांची 'ब्रिफिंग'ची जी बैठक झाली, त्या बैठकीमध्ये सुद्धा याबाबतीत चांगलीच चर्चा झाली. सुप्रिम कोर्टात आपण शपथपत्र दाखल करतो, त्या आधारावर तेथे सर्वोच्च न्यायालय आपल्या बाजूने निर्णय देते व आपण त्या निर्णयाच्या विपरित वर्तन करतो. या बाबीचे कसे समर्थन करणार? शिवाय गेल्या वेळेला आपण "लवकरात लवकर निर्णय घेऊ" असे सभागृहात सांगितले आहे. त्यावर काय उत्तर देणार? या चर्चेच्या शेवटी आजच्या आज शासननिर्णय काढा व सुधारित उत्तर तयार करा असा तेथे निर्णय झाला व सभागृह सुरू झाल्याबरोबर सुधारित उत्तर सभागृहात ठेवण्यात आले. "राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे वेतननिश्चिती करण्याबाबत" या विषयावरील "शासकीय महाविद्यालयातून राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या काम करणाऱ्या प्राध्यापकांना सन १९६३ ते १९६७ या कालावधीतील ज्येष्ठता यादीप्रमाणे ७०० ते १,१०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय;" या प्रश्न भाग एकला "होय" असे उत्तर देण्यात आले होते. "असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;" या प्रश्न भाग दोनच्या उत्तरात "**एकत्रित ज्येष्ठता यादीनुसार संबंधित प्राध्यापकांना रु.७००-११०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचे शासकीय आदेश काढण्यात आले आहेत**" असे नमूद होते. शासन आदेश कोणत्या तारखेला काढले? हे सुधारित उत्तरात नमूद नव्हते. सुधारित उत्तर सोबत **सहपत्र : ३** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**३०.** विधानपरिषदेमध्ये दिनांक ७ सप्टेंबर १९८२ रोजी या विषयावर "एकत्रित ज्येष्ठता यादीनुसार संबंधित प्राध्यापकांना ७००-११०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचे शासकीय आदेश काढण्यात आलेले आहे" असे सुधारित उत्तर दिले होते. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, सभागृहामध्ये प्रश्न असल्यामुळे व मूळ उत्तर असमाधानकारक असल्यामुळे सुधारित उत्तर त्याच दिवशी अगोदरच्या दिवशीची म्हणजे दिनांक ६ सप्टेंबर १९८२ ही तारीख टाकून "Placement of Professor/Lecturer in the scale of Rs. 700-1100" या मथळ्याचा एक शासननिर्णय काढण्यात आला होता. असे औपचारिकपणे सांगता येईल. अनौपचारिकपणे व व्यावहारिक भाषेत झालेला व्यवहार सांगायचा तर शासननिर्णय त्याच दिवशी (म्हणजे ७ तारखेला) काढण्याचे ठरले मात्र त्यावर तारीख अगोदरच्या दिवशीची टाकण्यात आली. या शासननिर्णयाने सन १९६३ ते १९६७ या काळातील इतिहास व राज्यशास्त्र या विषयाच्या एकूण १३ प्राध्यापकांना सेवाज्येष्ठतेनुसार ७००-११०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली होती. प्रा.प.सि.काणे यांना ती दिनांक ०१.०४.१९६६ पासून लागू करण्यात आली होती. एकूण या १३ प्राध्यापकांच्या यादीमध्ये ११ प्राध्यापकांना ती वेतनश्रेणी दिनांक ०१.०४.१९६६ पासून देण्यात आलेली होती. बाराव्या क्रमांकावर असलेले इतिहासाचे प्राध्यापक श्री.पी.एल.मिश्रा यांना ती दिनांक २ जुलै १९६६ पासून देण्यात आली होती.

**३१.** आमच्या दृष्टीने दिनांक ७ सप्टेंबर १९८२ रोजी सभागृहात देण्यात आलेले उत्तर व अगोदरच्या तारखेचा म्हणजे दिनांक ६ सप्टेंबर १९८२ रोजीचा काढण्यात आलेला शासननिर्णय समाधानकारक होता. त्यामुळेच आता यापेक्षा वेगळा काही खटाटोप सभागृहात करण्याची आवश्यकता नाही अशी आमची भावना झाली. **सेवाज्येष्ठता आता मान्य करण्यात आलेली असल्यामुळे क्लास वन दर्जा प्रदान करणे व प्राचार्य पदावर सेवाज्येष्ठतेप्रमाणे पदोन्नती देणे ह्या बाबी यथावकाश पण निश्चित होतील असे आम्ही गृहीत धरले होते.** या दोनही बाबतीत तक्रार करण्यासारखी शासनाची कोणतीही कृती सुद्धा झालेली नव्हती आणि त्यामुळेच १९८३ हे पूर्ण वर्ष याबाबतच्या कोणत्याही पाठपुराव्याशिवाय निघून गेले.

**३२.** सन १९८४ च्या सुरुवातीला शासनातर्फे करण्यात आलेली एक कृती ही विपरित कृती असल्याचे लक्षात आले. शासनाने दिनांक ३० जानेवारी १९८४ रोजी एक शासननिर्णय निर्गमित करून इतिहासाचे प्राध्यापक श्री.पी.एल.मिश्रा यांची राजाराम कॉलेज, कोल्हापूर या शासकीय महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून नियुक्ती केली. प्रा.प.सि.काणे यांनी दिनांक २८ फेब्रुवारी १९८४ रोजी याबाबतीत तक्रार करणारे निवेदन सादर केले. खरे म्हणजे या निवेदनाच्या आधारावर सभागृहात मला चर्चा उपस्थित करता आली असती. पण सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी आणखी एक संदर्भ म्हणून मी स्वतः मा.शिक्षणमंत्र्यांना दिनांक १९ मार्च १९८४ रोजी एक निवेदन सादर केले. या निवेदनासोबत दिनांक ३१ मार्च १९८२ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १३५५१ व दिनांक ७ सप्टेंबर १९८३ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १४१६९ ला मा.शिक्षणमंत्र्यांनी विधान परिषदेमध्ये दिलेले सुधारित उत्तर संदर्भ म्हणून नमूद केले होते.

**३३.** माझ्या निवेदनाच्या परिच्छेद २ मध्ये पुढीलप्रमाणे प्रतिपादन होते.:- "विधान परिषदेतील या प्रश्नोत्तरामुळे हा दोष शिक्षण खात्याच्या लक्षात आला व त्यामुळे शिक्षण खात्याने दिनांक ६ सप्टेंबर १९८२ रोजी संदर्भ क्रमांक ३ वर नमूद केलेला शासकीय निर्णय काढला व प्रा.प.सि.काणे यांना ०१.०४.१९६६ पासून ७००-११०० ही वेतनश्रेणी दिली व श्री.पी.एल.मिश्रा यांना ०२.०७.१९६६ पासून ही वेतनश्रेणी दिली व अंशतः का होईना पण प्रा.प.सि.काणे यांचेवरील अन्याय दूर झाला." या पत्राच्या शेवटी मी मा.शिक्षणमंत्र्यांना पुढीलप्रमाणे विनंती केली होती.:- "मी मुद्दाम आपणास हे पत्र लिहिण्याचे कारण असे की, प्रा.प.सि.काणे हे संयुक्त ज्येष्ठता यादीमध्ये श्री.पी.एल.मिश्रा यांना सिनिअर आहेत. (संदर्भ ३ मध्ये दिलेला शासकीय निर्णय पहावा) त्यामुळे त्यांना ०१.०४.१९६६ या तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने "क्लास वन" हा दर्जा द्यावा व प्रा.मिश्रा यांचेपूर्वी प्राचार्यपदी त्यांची नियुक्ती व्हावी ही त्यांची विनंती मान्य करावी व त्यांचेवरील अन्याय दूर करावा अशी माझी आपणास विनंती आहे." माझे दिनांक १९ मार्च १९८४ रोजीचे हे निवेदन सोबत **सहपत्र : ४** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**३४.** विधानमंडळाचे अधिवेशन सुरू असतांना दिनांक २४ एप्रिल १९८४ रोजी मा.शिक्षणमंत्री श्री.सुधाकरराव नाईक यांचा मला फोन आला व तुमच्या १९ मार्च १९८४ रोजी दिलेल्या निवेदनावर विचार करण्यासाठी मंत्रालयात माझ्या दालनामध्ये दुपारी १२ वाजता अनौपचारिक चर्चा ठेवली आहे तेव्हा तुम्ही उपस्थित असावे." खुद्द शिक्षणमंत्र्यांचा निरोप असल्यामुळे मी ठरलेल्या वेळी मा.शिक्षणमंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनामध्ये उपस्थित झालो. शिक्षण सचिव श्री.दैठणकर व या विभागाचा कार्यभार पाहणारे उपसचिव/सहसचिव श्री.देसाई हे या चर्चेच्या वेळी उपस्थित होते. चर्चेला सुरुवात मा.शिक्षणमंत्र्यांनी अशी केली की, "तुम्ही मला जे सभागृहात विचारणार आहात ते प्रश्न आता येथे विचारणे सुरू करा." त्यावर मी माझ्या पत्राला धरून मुद्दे मांडले.

**३५.** माझ्या प्रतिपादनातील मुख्य मुद्दा असा की, "शासनाने ६ सप्टेंबर १९८२ चा शासननिर्णय काढून प्रा.प.सि.काणे यांच्यापेक्षा प्रा.पी.एल.मिश्रा हे सेवेत कनिष्ठ आहेत ही गोष्ट मान्य केलेली आहे. मात्र प्राचार्य पदावर बढती देतांना प्रा.काणे यांना डावलून शिक्षण विभागाने प्रा.मिश्रा यांच्या बढतीचे आदेश काढलेले आहेत. ही गोष्ट पूर्णपणे चुकीची आहे." मा.शिक्षणमंत्री व शिक्षण सचिव हे दोघेही श्री.देसाई यांच्याकडे पहायला लागले. श्री.देसाई यांनी त्यांचे म्हणणे मांडले. ते असे की, "प्रा.काणे हे राज्यशास्त्र या विषयाचे आहेत व प्रा.मिश्रा हे इतिहास या विषयाचे आहेत. प्रा.मिश्रा यांना जी जागा देण्यात आलेली आहे ती प्रा.काणे यांना देता येणार नाही कारण ती इतिहास या विषयाची जागा आहे. हे दोन विषय वेगवेगळे आहेत."

**३६.** श्री.देसाई यांचे प्रतिपादन झाल्यानंतर मा.शिक्षणमंत्री व शिक्षण सचिव हे माझ्याकडे पहायला लागले. मी सुरुवात केली. "राज्यशास्त्र हा वेगळा विषय आहे व इतिहास हा वेगळा विषय आहे हे श्री.देसाई यांचे म्हणणे अगदी

बरोबर आहे. प्रा.काणे यांचेही म्हणणे तेच होते. इतिहास या विषयाच्या काही प्राध्यापकांना राज्यशास्त्र या विषयाच्या पात्र प्राध्यापकांना डावलून ७००-११०० ची वेतनश्रेणी बहाल करण्यात आली होती. प्रा.काणे यांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली व असे प्रतिपादन केले की, राज्यशास्त्र व इतिहास हे वेगवेगळे विषय आहेत. त्यामुळे सेवाज्येष्ठतेप्रमाणे ७००-११०० ची वेतनश्रेणी ही त्यांना मिळायला हवी. इतिहास विषयाच्या कनिष्ठ प्राध्यापकांना ती तुम्ही दिली. ही गोष्ट चुकीची आहे. **मा.उच्च न्यायालयाने प्रा.काणे यांचे म्हणणे मान्य केले.** त्यावर शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपील केले. "सन १९६३ ते १९६७ या काळात राज्यशास्त्र व इतिहास या विषयांची संयुक्त ज्येष्ठता यादी अस्तित्वात होती असे शपथपत्र राज्यशासनाने तेथे दाखल केले. **मा.सर्वोच्च न्यायालयाने राज्यशासनाचे म्हणणे मान्य केले.**

**३७.** "या संयुक्त ज्येष्ठता यादीमध्ये इतिहासाचे प्राध्यापक श्री.पी.एल.मिश्रा हे प्रा.काणे यांच्या पेक्षा जुनिअर आहेत हे मान्य करणारा शासननिर्णय तुम्ही दिनांक ६ सप्टेंबर १९८२ रोजी निर्गमित केला. मात्र त्यांची प्राचार्यपदी नियुक्ती केली नाही." हे ऐकून घेतल्यावर मा.सचिव श्री.दैठणकर यांनी श्री.देसाई यांच्याकडे पाहून असे सांगितले की, "विदर्भ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.ढमढेरे हे निवृत्त होत आहेत. तेव्हा प्राचार्य पदाची जबाबदारी प्रा.काणे यांच्यावर सोपविण्यात यावी असे आदेश काढण्यास संचालकांना सांगा." त्यावर मी असे म्हणालो की, "प्रा.काणे यांना योग्य त्या तारखेपासून क्लास वन (MES Class 1) दर्जा देण्याचा शासननिर्णय अगोदर निघायला हवा व त्यानंतर प्राचार्य पदाविषयी. तसे न केल्यास तेथे जे एक दोन प्राध्यापक क्लास वन दर्जा असलेले आहेत, त्यांना डावलल्या सारखे होईल." त्यानंतर श्री.दैठणकर यांनी असे उद्‌गार काढले की, "No no, let the department know the mind of the Government." त्याप्रमाणे संचालकांना फोनवरून आदेश देण्यात आले व त्याच दिवशी उच्च शिक्षण संचालकांनी "विदर्भ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.ढमढेरे हे सेवानिवृत्त होत आहेत तेव्हा प्राचार्य पदाची जबाबदारी प्रा.प.सि.काणे यांच्याकडे सोपविण्यात यावी" असे आदेश पारित केले. त्या आदेशाची प्रत **सहपत्र : ५** म्हणून प्रसृत केली आहे.

**३८.** शासनाच्या निदेशानुसार उच्च शिक्षण संचालक यांनी दिनांक २४ एप्रिल १९८४ रोजी काढलेल्या उपरोक्त आदेशामध्ये प्राचार्य ढमढेरे यांनी कार्यभार सोपविण्याबाबत "He should therefore hand over the charge of the post of Principal to Shri P.S.Kane, **Professor of Political Science"** अशी शब्दरचना वापरण्यात आलेली असल्यामुळे प्रा.काणे यांचे 'Professor' म्हणून Maharashtra Education Service (MES) Class I (Collegiate Branch) मध्ये नामांकन केल्याचे आदेश काढण्यात आले असतील किंवा काढण्यात येतील असे आम्हाला वाटले. त्याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, या आदेशावरून प्राचार्य पदावर प्रा.काणे यांची बढती करण्याचे आदेश निघालेले आहेत असे सुद्धा वाटत नव्हते. कारण "प्राचार्य पदाचा कार्यभार प्रा.काणे यांच्या सुपूर्त करावा" अशी शब्दरचना या आदेशात होती. त्याबाबतीतसुद्धा यथावकाश कारवाई केली जाईल असे आम्हास वाटले. पण तसे झाले नाही. सत्ता-समिपता असलेले मंडळ सावकाश रितीने पण विपरित दिशेने कार्य करीत होते.

**३९.** हे विपरित कार्य फलद्रूप होण्यासाठी त्यांना जवळ जवळ एक वर्षांचा वेळ लागला असे दिसून येते. दिनांक ६ मार्च १९८५ रोजी

---

### *सहपत्र १ : (परिच्छेद २६ पहा)*

### *राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे वेतन-निश्चिती करण्याबाबत*

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही: : पहिले अधिवेशन, १९८२*
*बुधवार, दिनांक ३१ मार्च १९८२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ६४, क्रमांक १५, पृष्ठ २४*

* १३५५१. **श्री.बी.टी.देशमुख** (विदर्भ पदवीधर) : सन्माननीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची संयुक्त ज्येष्ठता यादी १९६३ ते १९६७ या कालावधीत शासकीय निर्णयानुसार अस्तित्वात होती, हे खरे आहे काय;

(२) खरे असल्यास, सर्वोच्च न्यायालयामध्ये अशी संयुक्त ज्येष्ठता यादी त्या कालखंडात होती असे शासनाने नमूद करुनसुद्धा १ एप्रिल १९६६ पासून ज्येष्ठतेच्या आधारावर ७००-११०० या वेतनश्रेणीत स्थान निश्चिती करताना मात्र या संयुक्त यादीतील राज्यशास्त्राच्या काही ज्येष्ठ प्राध्यापकांची ज्येष्ठता दुर्लक्षित करण्यात आली अशी तक्रार राज्यशास्त्राच्या काही प्राध्यापकांनी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय;

(३) हे खरे असल्यास, सदहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

**श्री.विलासराव देशमुख, श्रीमती शरच्चंद्रिका पाटील यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय.

(३) त्यावर विचार चालू आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, प्रश्न क्रमांक एक व दोन यांची 'होय' अशा प्रकारची उत्तरे आहेत. परंतु तीनचे जे उत्तर आहे ते त्यावर 'विचार चालू आहे' असे आहे. अध्यक्ष महाराज, इतिहास आणि राज्यशास्त्र हे विषय एक केले, आमचे काही म्हणणे नाही. परंतु यामध्ये त्यांचा ज्येष्ठता क्रम डावलून जे खालचे लोक आहेत त्यांना प्रमोशन दिलेले आहे. तेव्हा शासनाचा विचार चालू आहे, तो कशावर चालू आहे?

**सभापती :** विचार चालू आहे असे उत्तर दिले आहे, विचार चालू नाही असे उत्तर दिलेले नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, ही बाब खरी म्हणजे विचार करण्यासारखी नाही. तरीही मी असे विचारतो की, हा विचार केव्हा पूर्ण होईल?

**श्री. विलासराव देशमुख :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांचा भावना लक्षात घेऊन हा विचार लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

---

### *सहपत्र २ : (परिच्छेद २७ पहा)*

### *राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे वेतन निश्चिती करण्याबाबत*

(३९) *१४१६८. **श्री.बी.टी.देशमुख** (विदर्भ पदवीधर) : तारांकित प्रश्न क्रमांक १३५५१ ला दिनांक ३१ मार्च १९८२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) शासकीय महाविद्यालयातून राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या काम करणाऱ्या प्राध्यापकांना सन १९६३ ते १९६७ या कालावधीतील ज्येष्ठता यादीप्रमाणे ७०० ते ११०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय;

(२) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(३) निर्णय अद्याप घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**सौ.शरच्चंद्रिका पाटील** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) १९६३ पासूनची माहिती एकत्रित करावयाची असल्यामुळे काही काळ लागत आहे.

---

### *सहपत्र ३ : (परिच्छेद २९ पहा)*

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही: : दुसरे अधिवेशन, १९८२*
*मंगळवार, दिनांक ७ सप्टेंबर १९८२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ६५, क्रमांक २, पृष्ठ २३*

### *सुधारित उत्तर*

### *राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापकांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे वेतन निश्चिती करण्याबाबत*

**श्री.बी.टी.देशमुख** (विदर्भ पदवीधर) : तारांकित प्रश्न क्रमांक १३५५१ ला दिनांक ३१ मार्च १९८२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) शासकीय महाविद्यालयातून राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या काम करणाऱ्या प्राध्यापकांना सन १९६३ ते १९६७ या कालावधीतील ज्येष्ठता यादीप्रमाणे ७०० ते १,१०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय;

(२) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(३) निर्णय अद्याप घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**सौ.शरच्चंद्रिका पाटील** (शिक्षण मंत्री) : (१) होय.

(२) एकत्रित ज्येष्ठता यादीनुसार संबंधित प्राध्यापकांना रु.७००-१,१०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचे शासकीय आदेश काढण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

“Appointments and transfers of Principals in Govt. Arts, Science and Commerce Colleges, Maharashtra Education Service Class I (Administrative Branch)” या मथळ्याचा एक शासननिर्णय (No. SCP-1084/211 (1332) PS-2) मंत्रालयातून निर्गमित करण्यात आला. या आदेशाच्या परिच्छेद २ मध्ये पुढील मजकूर होता. :- “श्री.ढमढेरे यांच्या निवृत्तीमुळे रिक्त झालेल्या विदर्भ महाविद्यालय अमरावती येथील प्राचार्य पदाच्या जागेवर औरंगाबादच्या शासकीय महाविद्यालयात कार्यरत असलेले प्रा.एम.आर.मोहळकर यांची प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.” याच आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढे असेही नमूद होते की, “श्री.पी.एल.मिश्रा यांची नागपूर येथे प्राचार्य पदावर बदली करण्यात येत आहे.” असे करतांना श्री.पी.एल.मिश्रा यांची २६ नोव्हेंबर १९६६ या अगोदरच्या तारखेपासून Professor in History म्हणून क्लास वन मध्ये नेमूणक केल्याचे आदेश पूर्वीच काढण्यात आले होते.

**४०.** दिनांक ६ मार्च १९८५ रोजीच्या या आदेशामुळे प्रा.काणे, प्रा.बी.के.जोशी यांच्या पेक्षा सेवेत कनिष्ठ असलेल्या श्री.पी.एल.मिश्रा यांना Professor पद व प्राचार्य पद बहाल करण्यात आले होते. प्रा.काणे यांनी या अन्यायाचा आक्रमकपणे प्रतिकार करण्याचे ठरविले. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.नागपूर खंडपीठासमोर याबाबतची याचिका (W.P.No. 751 of 1985) दाखल केली. प्रा.बी.के.जोशी यांनी सुद्धा अशीच याचिका (W.P.No. 207 of 1985) याच खंडपीठापुढे दाखल केली होती. प्रा.काणे यांच्या याचिकेमध्ये (Writ Petition No. 751 of 1985) यापूर्वीचा सारा घटनाक्रम नमूद केला होता. या याचिकेतील प्रार्थना खंडा (Prayer Clause) मध्ये मुख्य विनंती पुढीलप्रमाणे होती. :-

“The Petitioner, therefore, prays that this Hon'ble Court may kindly be pleased to :

(i) issue a writ of mandamus directing the State Government to implement the combined seniority list issued under the Government Resolution dated 06.09.1982 by assigning the petitioner deemed date of promotion to the post of Professor in Political Science and showing him senior to respondent Shri P.L.Mishra in that cadre and further directing the respondents to consider the claim of the petitioner for being promoted to the post of Principal as on the date on which the respondent Shri P.L.Mishra was promoted to officiate as Principal under the Government Resolution dated 30.01.1984.

(ii) issue a suitable writ, order or direction interim restraining the State Government from giving effect to the orders of promotion and transfer directed under the Government Resolution dated 06.03.1985 in so far as it has the effect of displacing the petitioner from holding the charge of Principal at

### *सहपत्र ४ : (परिच्छेद ३३ पहा)*

**प्रा.बी.टी.देशमुख**, विधान परिषद सदस्य,

विदर्भ महाविद्यालयाजवळ, अमरावती-४४४६०४ फोन नं. ३६४६ : क्र.एलसी/एफ/६८

**दिनांक : १९.०३.१९८४**

प्रति,

मा.शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय :** विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथील राज्यशास्त्राचे प्राध्यापक श्री.प.सि.काणे यांना “क्लास वन” दर्जा देण्याबाबत व प्राचार्य म्हणून नियुक्ती होण्याबाबत.

**संदर्भ :** (१) विधान परिषदेमध्ये दिनांक ३१ मार्च १९८२ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १३५५१ ला मा.शिक्षणमंत्र्यांनी दिलेले उत्तर. (२) दिनांक ७ सप्टेंबर १९८३ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १४१६९ ला मा.शिक्षणमंत्र्यांनी विधान परिषदेमध्ये दिलेले सुधारित उत्तर. (३) शासन निर्णय क्रमांक एम.ई.एस.-१०८१/१२५२००(५००) - ए.डी.एम.-२ दिनांकित ६ सप्टेंबर १९८२. (४) शासन निर्णय क्रमांक एस.सी.पी./१०८०/३२९४/(७४५) प्रशा-२ दिनांकित ३० जानेवारी १९८४. (५) प्रा.प.सि.काणे, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांनी मा.शिक्षण सचिव यांना प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांच्या मार्फत केलेला विनंती अर्ज-दिनांकित २८.०२.१९८४.

मा.श्री.सुधाकररावजी नाईक,

स.न.वि.वि.

विधान परिषदेमध्ये संदर्भ क्रमांक १ व २ वरील झालेल्या प्रश्नोत्तराची एक प्रत मी आपल्या त्वरीत संदर्भासाठी सोबत पाठवित आहे. अवलोकनानंतर आपणास असे आढळून येईल की, शिक्षण खात्याने १९६३ ते १९६७ या काळात राज्यशास्त्र व इतिहास हे दोन विषय एकत्र मानून संयुक्त ज्येष्ठता यादी तयार केलेली होती. राज्यशास्त्र या विषयाच्या काही ज्येष्ठ प्राध्यापकांना डावलून त्यामुळे इतिहास या विषयाच्या काही प्राध्यापकांना ज्येष्ठता दिल्या गेली. त्यामुळे प्रा.प.सि.काणे यांना ७००-११०० ही वेतनश्रेणी १९.०५.१९७१ या तारखेपासून देण्यात आली व संयुक्त ज्येष्ठता यादीमध्ये प्रा.काणे यांना ज्युनिअर असलेले श्री.पी.एल.मिश्रा यांना मात्र ७००-११०० वेतनश्रेणी ही ०१.०४.१९६६ पासून देण्यात आली होती.

२. विधान परिषदेतील या प्रश्नोत्तरामुळे हा दोष शिक्षण खात्याच्या लक्षात आला व त्यामुळे शिक्षण खात्याने दिनांक ६ सप्टेंबर १९८२ रोजी संदर्भ क्रमांक ३ वर नमूद केलेला शासकीय निर्णय काढला व प्रा.प.सि.काणे यांना ०१.०४.१९६६ पासून ७००-११०० ही वेतनश्रेणी दिली व श्री.पी.एल.मिश्रा यांना ०२.०७.१९६६ पासून ही वेतनश्रेणी दिली व अंशतः का होईना पण प्रा.प.सि.काणे यांचेवरील अन्याय दूर झाला.

३. आता मी आपले लक्ष संदर्भ क्रमांक ४ वर नमूद केलेल्या शासन निर्णयाकडे वेधू इच्छितो. सदरहू निर्णयाप्रमाणे प्रा.श्री.पी.एल.मिश्रा यांची राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे प्राचार्य म्हणून नियुक्ती झालेली आहे. प्रा.प.सि.काणे यांनी याबाबतीत यथोचितरित्या आपली तक्रार शासनाकडे नोंदविलेली आहे. (संदर्भ क्रमांक ५)

४. प्रा.श्री.प.सि.काणे हे राज्यशास्त्राचे नामवंत प्राध्यापक आहेत. राज्यशास्त्रावरील त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. विदर्भ महाविद्यालयातील माझ्या विद्यार्थी जीवनात ते माझे प्राध्यापक होते केवळ एवढ्यामुळेच नव्हे तर वस्तुतः त्यांच्यावर अन्याय झालेला आहे तो दूर करता यावा या दृष्टीने मी हा प्रश्न उपस्थित केला होता व त्यामुळे हा अन्याय काही प्रमाणात दुरही झालेला आहे.

५. मी मुद्दाम आपणास हे पत्र लिहिण्याचे कारण असे की, प्रा.प.सि.काणे हे संयुक्त ज्येष्ठता यादीमध्ये श्री.पी.एल.मिश्रा यांना सिनिअर आहेत. (संदर्भ ३ मध्ये दिलेला शासकीय निर्णय पहावा) त्यामुळे त्यांना ०१.०४.१९६६ या तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने “क्लास वन” हा दर्जा द्यावा व प्रा.मिश्रा यांचेपूर्वी प्राचार्यपदी त्यांची नियुक्ती व्हावी ही त्यांची विनंती मान्य करावी व त्यांचेवरील अन्याय दूर करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

आपला विश्वासू

**बी.टी.देशमुख**, विधान परिषद सदस्य

पत्राची प्रत माननीय सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग यांना आवश्यक कार्यवाही व्हावी या विनंतीसह सादर अग्रेषित.

### *सहपत्र ५ : (परिच्छेद ३७ पहा)*

*Telephone message to the Principal, Vidarbha Mahavidyalaya, Amravati*

The date of birth of Shri R.Dhamdhere, Principal, Vidarbha Mahavidyalaya, Amravati is 21.04.1926. He is completing 58 years of age on 21.04.1984. He should therefore hand over the charge of the post of Principal to Shri P.S.Kane, **Professor of Political Science,** of his college on 30.04.1984 and retire from Government service on superannuation.

No. MMB/1084/II-A

**Director of Education, M.S. Pune**

Dated 24.04.1984

Copy forwarded for information and necessary action.

Sd/- S.B.Salunke
Deputy Director of Education
(Higher Education)

To,
The Principal Vidarbha Mahavidyalaya, Amravati
Shri P.S.Kane, **Professor of Political Science,** VMV Amravati.

Copy submitted to the Secretary to government in Education and Employment Department, Mantralaya, Annexe-Bombay-32 for favour of information.

True Copy
Advocate

Vidarbha Mahavidyalaya, Amravati, pending decision of this petition."

**४१.** उच्च शिक्षण विभागाच्या मनमानी वर्तनाचे सारे तपशील या याचिकेतून मा.उच्च न्यायालयासमोर मांडले होते. मा.उच्च न्यायालयाने याबाबतच्या प्राथमिक सुनावणीत **"It is hereby accordingly ordered that status quo be maintained in the above matter until further orders of this Court."** असे आदेश पारित केले. शासनाच्या अवर सचिवांनी दिनांक ३ एप्रिल १९८५ रोजी उच्च शिक्षण विभागाच्या संचालकांना एका पत्रान्वये (क्रमांक : एलसीपी १०८५/१५६७८६/(१८१८) प्रशा-२) हे आदेश कळविले. हे आदेशपत्र सोबत **सहपत्र : ६** म्हणून प्रसृत केलेले आहे. या आदेशाने मंत्रालयीन सत्ता-समीपता मंडळाचा कट तात्पुरता का होईना पण उद्ध्वस्त झाला.

**४२.** मा.उच्च न्यायालयामध्ये या प्रकरणी सुनावणी चालू राहिली. याबाबतीत दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी मा.उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारित केले:-

**"The Petitioner P.S.Kane in Writ Petition No. 751 of 1985 shall also be promoted to the post of Principal by showing him senior to Mr.P.L.Mishra.** The respondent no. 1 is directed to do this by quashing the proposed appointment order of Mr.Mishra and/or of other respondents, if necessary. Mr.Kane and Mr.Joshi shall be appointed as Principals with effect from the deemed date on which Mr.Mishra and the next below him were appointed as Principals. The rule is made absolute in terms above. The respondent no. 1 shall also bear the costs of the petitioners in the respective petition in addition to their own. Remaining respondents to bear their own costs."

**४३.** मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ च्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे मा.नागपूर खंडपीठापुढे अवमान याचिका दाखल करण्यात आली. मा.उच्च न्यायालयाने अवमान याचिका प्रकरणात हजर रहाण्याविषयी शिक्षण सचिवांना दिनांक ७ जुन १९८८ या तारखेला कोर्टात हजर रहाण्याचे आदेश काढले. शासनाने तारीख मागितली. हायकोर्टाने १७ जून १९८८ ही तारीख दिली. पुन्हा पुढची तारीख मागितली. कोर्टाने ३० जून १९८८ ची तारीख दिली. पुन्हा पुढची तारीख मागितली. तर १८ जुलै १९८८ ला सचिवांना व्यक्तीशः हजर राहण्याचा खंडपीठाने आदेश दिला होता.

**४४.** मा.उच्च न्यायालयाचे आदेश झाल्यानंतर सुद्धा मंत्रालयातून कोणतीही कारवाई होत नव्हती. त्यावेळेला आम्ही हा प्रश्न नियम ९३ द्वारा सभागृहात उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. मा.सभापती श्री.जयंतराव टिळक यांच्या, मंत्रालयाशी समीपता असलेल्या मंडळींकडून चालत असलेला हा एकतर्फी कारभार, लक्षात आला होता व त्यामुळे त्यांनी हा नियम ९३ चा जरी विषय होत नाही तरी आपण लक्षवेधी द्या असे सांगितले व २१ तारखेला याविषयीची लक्षवेधी आपण घेऊ असेही मा.सभापतींनी सांगितले. याबाबतचे सभागृहाच्या कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन शब्दशः सोबत **सहपत्र : ७** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**४५.** "शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे क्लास वन दर्जा देणे व प्राचार्यपदी बढती देणे याबाबत" या विषयावरील आम्ही दिलेली लक्षवेधी सूचना गुरूवार, दिनांक २१ जुलै १९८८ रोजी सभागृहामध्ये चर्चेसाठी आली. आमच्या लक्षवेधी सूचनेचा मसुदा पुढीलप्रमाणे होता :-

"**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"तारांकित प्रश्न क्रमांक १४१६८ ला दिनांक ७ सप्टेंबर १९८२ रोजी सुधारित उत्तर सभागृहासमोर देऊन शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांना संयुक्त ज्येष्ठता यादीप्रमाणे ७००-११०० ही वेतनश्रेणी देण्याचे आदेश दिनांक ६ सप्टेंबर, १९८२ रोजी प्रसृत होणे, सेवा ज्येष्ठतेनुसार त्यांना ७००-११०० ही वेतनश्रेणी देण्यात आली असली तरी ज्येष्ठतेच्या आधारावर 'क्लास वन दर्जा' व प्राचार्यपदी बढती यापासून त्या प्राध्यापकांना अनेक वर्षे वंचित ठेवणे, या प्रकाराविरुद्ध मुंबई खंडपीठाच्या नागपूर बेंचसमोर रिट पिटीशन नंबर ७५१/१९८५ मध्ये सदरहू प्राध्यापकांनी केलेल्या अर्जाचा दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी उक्त प्राध्यापकांच्या बाजूने निकाल लागणे, मात्र ज्येष्ठ प्राध्यापकांना प्राचार्य म्हणून बढती देण्याचे बाजूला ठेवून दिनांक ६ मार्च १९८५ रोजी दुसऱ्याच ६ प्राध्यापकांना प्राचार्य म्हणून बढती देणे, त्यावर केलेल्या याचिकेच्या संदर्भात दिनांक १ जुलै १९८८ रोजी नागपूर खंडपीठाने शिक्षण सचिवांना दिनांक १८ जुलै १९८८ रोजी खंडपीठासमोर हजर राहण्याचा दिलेला आदेश व त्या दृष्टीने शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरुवार,*

---

*सहपत्र ६ : (परिच्छेद ४१ पहा)*

***महाराष्ट्र शासन : शिक्षण व सेवायोजन विभाग***

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

क्रमांक : एलसीपी १०८५/१५६७८६/(१८१८) प्रशा-२

**दिनांक : ३ एप्रिल १९८५**

*कालमर्यादित : कोर्टप्रकरण*

प्रति,

शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय** : रिट पिटीशन नंबर ७५१/८५, श्री.पी.एस.काणे विरुद्ध महाराष्ट्र शासन.

हायकोर्ट ऑफ ज्युडीकेचर ॲपेलेट साईड, मुंबई नागपूर बेन्च, नागपूर यांनी वरील रिट पिटीशनमध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

**It is hereby accordingly ordered that status quo be maintained in the above matter until further orders of this Court.**

तेव्हा आपणांस विनंती करण्यात येते की, हायकोर्टाने दिलेल्या आदेशानुसार त्वरित कार्यवाही करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांना त्याप्रमाणे कळविण्यात यावे. हायकोर्टाच्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

**(आ.ठा.तुललियानी)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

प्रभारी प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांचेकडे अग्रेषित

श्री.पी.एस.मोहळकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्या मार्फत.

---

*सहपत्र ७ : (परिच्छेद ४४ पहा)*

*शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांना संयुक्त जेष्ठता यादीप्रमाणे ७००-११०० ही वेतनश्रेणी द्यावयाचा दिनांक ६.९.१९८२ चा शासन निर्णय, तसेच सेवाजेष्ठतेनुसार त्यांना 'क्लास वनचा' दर्जा व प्राचार्यपदी बढती,या पासून वंचित ठेवणे इत्यादी बाबत नियम ९३ अन्वये सूचना*

*महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही: : दुसरे अधिवेशन, १९८८*
*शुक्रवार, दिनांक ८ जुलै १९८८*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड ८३, क्रमांक ७, पृष्ठ ३६*

**सभापती** : सन्माननीय सभासद सर्वश्री.बी.टी.देशमुख व पु.ब.सोमवंशी यांनी "शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांना संयुक्त ज्येष्ठता यादीप्रमाणे ७००-११०० ही वेतनश्रेणी द्यावयाचा दिनांक ६.९.१९८२ चा शासन निर्णय, तसेच सेवाज्येष्ठतेनुसार त्यांना "क्लास वनचा" दर्जा व प्राचार्यपदी बढती, यापासून वंचित ठेवणे इत्यादी बाबत नियम ९३ अन्वये सूचना दिलेली आहे. सन्माननीय सभासदांना मी सागू इच्छितो की नियम ९३ च्या सूचनेचा हा विषय नाही तेव्हा याबाबत लक्षवेधी सूचना द्यावी.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, आपले म्हणणे मला मान्य आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, शिक्षण सचिवांना दिनांक २९ जुलै १९८८ रोजी कोर्टामध्ये उपस्थित राहण्यासंबंधी सांगण्यात आलेले आहे.

**सभापती** : आपण लक्षवेधी सूचना लवकर द्या.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, काल केंद्र सरकारचे आदेश बरोबर वाचत नाही हा प्रश्न सभागृहासमोर आलेला होता. हायकोर्टाने याबाबतीत जे काही आदेश दिलेले आहे ते सुद्धा वाचत नाही. २१ तारखेला ही लक्षवेधी सूचना घेण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे. २१ तारखेला याबाबत लक्षवेधी सूचना घेऊ.

*दिनांक २१ जुलै १९८८ : खंड ८३, क्रमांक ८, पृष्ठ ६५)*

**४६.** हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई केली पाहिजे असे मंत्र्यांना वाटत होते. या मुद्यांवर शासनातर्फे करण्यात आलेले लेखी निवेदन सत्ता-समिपता असलेल्या मंडळींच्या दबावाखाली मंत्रालयातील अधिकाऱ्यांमार्फत तयार करण्यात आलेले होते. त्यामध्ये सारा इतिहास सांगून लेखी निवेदनाच्या शेवटी असे नमूद करण्यात आले होते की, **"डॉ.पी.एल्.मिश्रा यांना दिनांक १८ जून १९६८ पासून प्राध्यापक पदावर पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याचे शासनाने प्रस्तावित केले असून त्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेला आहे. आयोगाचा अभिप्राय प्रतिक्षाधीन आहे. आयोगाचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सर्वश्री काणे व जोशी यांना प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्याचा विचार करण्यात येणार आहे. वरील परिस्थितीमुळे जरी उच्च न्यायालयाने सर्वश्री काणे व जोशी यांच्या बाजूने निकाल दिला असला तरी शासनातर्फे उचित कार्यवाही करता आली नाही.** त्याचप्रमाणे उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी निकाल दिला असला तरी त्या निकालाची प्रमाणित प्रत १६ जून १९८८ रोजी शासनास प्राप्त झाली. ही वस्तुस्थिती उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरुवार, दिनांक २१ जुलै १९८८ : खंड ८३, क्रमांक ८, पृष्ठ ६६-६७)*

**४७.** या प्रश्नावर सभागृहामध्ये बरीच तपशीलवार चर्चा झाली. विधानपरिषदेच्या कामकाजाच्या अधिकृत प्रतिवेदनामध्ये जवळ जवळ ६ पृष्ठे या चर्चेने व्यापलेली आहेत. त्यामुळे विस्तारभयास्तव ही पूर्ण चर्चा शब्दशः नमूद करण्याचे मी टाळले आहे, पण उत्सुकता म्हणून ही सारी चर्चा वाचावयाची असल्यास महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही दुसरे अधिवेशन १९८८ गुरुवार, दिनांक २१ जुलै १९८८ अधिकृत प्रतिवेदन : खंड ८३, क्रमांक ८, पृष्ठ ६५ ते ७० या ठिकाणी ही चर्चा वाचायला मिळेल. या चर्चेमध्ये मी स्वतः तपशीलवार माहिती दिली. शासनाच्या वतीने राज्यमंत्री श्री.जावेद खान हे उत्तरे देत होते. एकंदर चर्चा काळजीपूर्वक वाचली तर असे दिसून येते की, लेखी निवेदन हे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी तयार केलेले होते आणि मा.मंत्र्यांना त्यातील भूमिका अजिबात मान्य नव्हती.

**४८.** मंत्र्यांनी दिलेली उत्तरे ही लेखी निवेदनात मांडलेल्या भूमिकेच्या पूर्णपणे वेगळी होती. मा.राज्यमंत्र्यांनी या चर्चेमध्ये दिलेली महत्त्वपूर्ण आश्वासने पुढीलप्रमाणे आहेत:-

**(i) "प्रा.जावेद खान :** चूंकि यह २ टीचर के कैरियर का सवाल है, जिन्होंने बहुत लम्बी सर्विस की है. **सरकारने ने डिसाइड कर लिया है की उनको प्रिंसिपल का पद दे देंगे, उनके जो भी कोई लाभ डीम डेट्स् होंगे, कोर्ट के ऑर्डर के हिसाब से सब कुछ दे देंगे."** *(पृष्ठ ८/६८)*

**(ii) "प्रा.जावेद खान :** अध्यक्ष महोदय, कोर्ट ने २९ जुलाई तारीख दी है और २९ **जुलाई ही इस सेशन का आखिरी दिन है. इसलिए २९ जुलाई से पहले इन दोनों को प्रिंसिपल की पोस्टिंग मिल जाएगी."** *(पृष्ठ ८/६८)*

**(iii) "प्रा.जावेद खान :** लेकिन सरकार ने तय कर लिया है कि यह सेशन खत्म होने के पहले इन दोनो टिचर्स को प्रिंसिपल की पोस्टिंग मिल जाएगी और जो भी डिफरेंस होगा वह सब हो जायेगा." *(पृष्ठ ८/६९)*

**(iv) "श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, कोणताही गोंधळ राहू नये म्हणून मुद्दाम मी शेवटचा प्रश्न विचारतो. ७ सप्टेंबर १९८२ ला सभागृहामध्ये आपण एक उत्तर दिले आणि आपण ६ सप्टेंबर १९८२ चे आदेश प्रसृत केले आहे. प्रा.काणे व जोशी यांना अनुषंगिक ७००-११०० वेतनश्रेणी दिली फायद्यासंबंधी मुद्दा आहे. क्लास वन दर्जा व प्राचार्य म्हणून नेमणूक करावयाची राहिली आहे. **तेव्हा कोर्टाने आपल्याला २९ तारखेस हजर राहण्यास सांगितले आहे. . . अपिलात शासन जाणार नाही असा निर्णय शासनाने काल घेतला आहे हे खरे आहे काय? तसेच २९ तारखेपर्यंत हायकोर्टाचा २५ फेब्रुवारी १९८८ चा जो आदेश आहे त्याची अम्मलबजावणी करणारे शासन आदेश काढून कोर्टाच्या कटेम्प्ट ऑफ कोर्ट प्रोसिजर प्रकरणात आपण उच्च न्यायालयाला सादर करणार आहोत, हे खरे आहे ना?**

**प्रा.जावेद खानः** होय." *(पृष्ठ ८/७०)*

**४९.** दिनांक २१ जुलै १९८८ रोजी विधानपरिषदेत झालेल्या चर्चेमुळे हा प्रश्न सुटण्याच्या दिशेने चांगली वाटचाल झालेली होती असे म्हणता येईल. मा.उच्च न्यायालयामध्ये उत्तम यश मिळाल्यानंतर सुद्धा सर्वोच्च न्यायालयात पूनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल करून याचिकाकर्त्यांचा छळ करण्याचा मार्ग अधिकारी वर्ग आपल्या हातात मजबूत धरून ठेवतात. अगदी सुरुवातीला प्रा.काणे यांच्याबाबतसुद्धा या मार्गाचा वापर करण्यात आला होता. आजच्या या चर्चेमध्ये शासन या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात अपील करणार नाही ही गोष्ट शासनातर्फे स्पष्ट शब्दात मान्य करण्यात आलेली होती. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, अपील तर नाहीच पण दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजीच्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल असे आश्वासन सभागृहामध्ये देण्यात आलेले होते. अशी अंमलबजावणी करणारे आदेश दिनांक २९ जुलै १९८८ पर्यंत काढण्यात येईल असेही आश्वासन शासनातर्फे देण्यात आलेले होते. उपरोक्त दोनही याचिकाकर्त्यांना मानीव दिनांकापासून (deemed date) पासून प्राचार्य पदावर बढती देणारे हे आदेश असतील असेही आश्वासन देण्यात आले होते.

**५०.** मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सुनावणीत असलेल्या अवमान याचिकेमध्ये शासनातर्फे कोणताही जबाब आजपावेतो दाखल करण्यात आलेला नव्हता. या ना त्या कारणावरून वारंवार तारखा घेण्याचा उपक्रम उच्च शिक्षण सचिवांच्या वतीने उच्च न्यायालयात जोरात सुरू होता. दिनांक १८ जुलै १९८८ रोजी सचिवांनी व्यक्तिशः हजर रहावे असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले होते. मात्र शिक्षण सचिव त्यादिवशी उपस्थित राहिले नाहीत. ते हजर न राहिल्यामुळे आता २९ जुलै १९८८ ची शेवटची तारीख मा.उच्च न्यायालयाने दिली त्या तारखेला सचिव हजर न झाल्यास त्यांना सक्तीने धरून आणण्याची प्रक्रिया पार पाडावी लागेल असे १८ जुलैच्या आदेशात पुढील शब्दात नमूद होते.:-

"As a last chance he is allowed to remain present in person in this case on 29th July 1988. If he fails to remain present on 29th July 1988, resort will be taken to coercive process on 29th July 1988 to secure his presence in this court thereafter."

दिनांक २९ जुलै १९८८ रोजी शिक्षण सचिव स्वतः मा.न्यायालयात हजर राहिल्या व उभय याचिकाकर्त्यांना प्राचार्य पदावर रितसर नियुक्ती दिल्याचा दिनांक २६.०७.१९८८ या तारखेचा शासननिर्णय त्यांनी तेथे दाखल केला.

**५१.** याचिकाकर्त्या दोनही प्राध्यापकांना प्राचार्य पदावर नियुक्ती देणारे आदेश दिनांक २६ जुलै १९८८ रोजी उच्च शिक्षण विभागाने काढले व ते न्यायालयात दाखल केले होते. हे आदेश सोबत **सहपत्र : ८** म्हणून प्रसृत केलेले आहे. प्राचार्य पदावर बढती झाली पण ती सेवाज्येष्ठतेप्रमाणे मानीव

### *सहपत्र ८ : (परिच्छेद ५१ पहा)*

*महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग-१ (महा.शाखा) शासकीय महाविद्यालय प्राचार्यांच्या नेमणुका*

**महाराष्ट्र शासन : शिक्षण व सेवायोजन विभाग**

शासन निर्णय क्रमांक : एससीपी १०८८/६२४६९/(३६२१)/प्रशा-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

**दिनांक : २६ जुलै १९८८**

***शासन निर्णय***

**शासन निर्णय :** शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक : एससीपी १०८८/(३६२१)/प्रशा-२, दिनांक २६ जुलै १९८८ अन्वये पदोन्नत झालेल्या अधिव्याख्यात्यांची नियुक्ती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्या धारण करीत असलेले पद | पदोन्नतीनंतर नियुक्तीचे नवीन पद |
|---|---|---|---|
| (१) | श्री.पी.एस.काणे | अधिव्याख्याता, विदर्भ महाविद्यालय, अमरावती | प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय, अमरावती |
| (२) | श्री.बी.के.जोशी | अधिव्याख्याता, कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | संचालक, परीक्षा पूर्व केंद्र, औरंगाबाद |

२. संबंधित प्राचार्य/संचालक यांनी पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांच्या जागी स्थानिक व्यवस्था करून त्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या जागी रुजू होण्यासाठी त्वरित कार्यमुक्त करावे.

३. परिच्छेद एक नुसार नेमणूक झालेल्या अधिकाऱ्यांनी नेमणुकीच्या ठिकाणी रुजू झाल्याचा दिनांक शासनास कळवावा.

४. वरील आदेश त्वरित अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(दे.ह.तामोरे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

तारखेपासून (deemed date) झाली किंवा नाही 'क्लास वन' दर्जा देण्याबाबतचे आदेश निर्गमित करून दिनांक २६ जुलै १९८८ चे आदेश काढलेले आहेत की त्याशिवाय काढलेले आहेत? उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व सभागृहात कबूल केल्याप्रमाणे ज्येष्ठतेनुसार मानीव तारखेपासून प्राचार्य पदी ही बढती असेल तर त्याबाबतच्या थकबाकीचे काय? यासारखे लहान-मोठे अनेक प्रश्न त्यातून शिल्लक राहिले होते. असे असले तरी आता सभागृहामध्ये पाठपुरावा करण्याची गरज राहिलेली नव्हती. मजबूत आश्वासने मिळालेली असल्यामुळे आता या प्रश्नाचा विधानपरिषद आश्वासन समितीमध्ये पाठपुरावा करण्याचे आम्ही ठरविले. योगायोगाचा भाग असा की, त्यावेळेला मी स्वतः आश्वासन समितीचा समितीप्रमुख होतो आणि त्यामुळे या कामाला तातडीने सुरुवात करता आली.

**५२.** सभागृहामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांचा पाठपुरावा करण्यासाठी विधानपरिषदेची आश्वासन समिती काम करीत असते. या आश्वासन समितीचे मुख्य काम म्हणजे दिलेल्या आश्वासनांच्या बाबतीत आश्वासन पूर्तीची कारवाई शासनातर्फे वेळेच्या आत व यथोचितरित्या झाली किंवा नाही याची पाहणी करणे हे असते. शासनाकडून आलेल्या कारवाई विवरणपत्रांची छाननी करून याबाबतीत सभागृहाला समितीने अहवाल सादर करावयाचा असतो. "**शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना सेवा जेष्ठतेप्रमाणे प्राचार्यपदी बढती देणे व क्लास वन दर्जा देणे**" या विषयावर सभागृहामध्ये शासनातर्फे दिनांक २१ जुलै १९८८ रोजी जी आश्वासने देण्यात आली त्या आश्वासनांच्या बाबतीत करण्यात आलेल्या कारवाईची छाननी करण्याचा निर्णय विधानपरिषद आश्वासन समितीने दिनांक २७ जून १९८९ रोजीच्या बैठकीमध्ये घेतला. दिनांक २७ जून १९८९ रोजीच्या बैठकीमध्ये कोण कोण सदस्य व अधिकारी उपस्थित होते याबाबतचा **सन १९८९ च्या आश्वासन समितीच्या अधिकृत कार्यवृत्तातील *(पृष्ठ ६९)* भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :-**

"विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक २७ जून, १९८९ रोजी दुपारी २.०० वाजता विधान भवन, मुंबई समिती कक्ष क्रमांक १९०२ (१९ वा मजला) येथे घेण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

: उपस्थिती :

(१) श्री.बी.टी.देशमुख, वि.प.स. समिती प्रमुख
(२) श्री.पंजाबराव देशमुख, वि.प.स.
(३) श्री.त्र्यंबक गोपाळराव देशमुख, वि.प.स.
(४) श्री.ज.य.टेकावडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
श्री.विजय कुळकर्णी, अवर सचिव."

**५३.** आश्वासन समितीला जी आश्वासने विचारात घ्यावयाची आहेत ती कोणत्या विषयाशी संबंधित आहेत. त्याचबरोबर कोणत्या तारखेला ती सभागृहात देण्यात आलेली आहेत याबाबतचे नेमके संदर्भ आश्वासन समितीला नमूद करावे लागतात. विषय व संदर्भ या विषयीचा **आश्वासन समितीच्या अधिकृत कार्यवृत्तातील भाग पुढीलप्रमाणे:-**

"**१. विषय** :- शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना सेवा जेष्ठतेप्रमाणे प्राचार्यपदी बढती देणे व क्लास वन दर्जा देणे.

**२. संदर्भ** :- २१.७.८८ रोजी उक्त विषयीच्या लक्षवेधी सूचनेवर झालेली अनुपूरक चर्चा पृष्ठ एल-२ ते एम-३, अेल-४, एम-१, एम-२." *(पृष्ठ ८८)*

**५४.** आश्वासन समितीने छाननीसाठी घ्यावयाच्या आश्वासनांचा नेमका तपशीलसुद्धा या समितीला निश्चित करून द्यावा लागतो. शासनातर्फे देण्यात आलेल्या कोणत्या वाक्संहितेला आश्वासन म्हणावे हे नियमांनी ठरवून दिलेले असते व छाननीसाठी घ्यावयाच्या या आश्वासनांचा तपशील काटेकोरपणे निश्चित काढून द्यावा लागतो. तसा तो आश्वासन समितीने २७ जून १९८९ च्या या बैठकीमध्ये निश्चित करून दिलेला होता. याबाबतचा अधिकृत कार्यवृत्तातील भाग पुढीलप्रमाणे :-

"**३. आश्वासनाचा तपशिल** :-

**प्रा.जावेद खान** : चुंकी यह २ टीचर के कैरियर का सवाल है, जिन्होंने बहुत लम्बी सर्विस की है, सरकार ने डिसाईड कर लिया है कि उनके प्रिंसिपल का पद दे देंगे, उनके जो भी कोई लाभ डीम डैट्स होंगे, कोर्ट के ऑर्डर के हिसाब से सब कुछ दे देंगे.

**प्रा.जावेद खान** : अध्यक्ष महोदय, कोर्ट नें २९ जुलाई तारीख दी है और २९ जुलाई ही इस सेशन का आखिरी दिन है. इसलीये २९ जुलाई से पहले इन दोनों को प्रिंसिपल की पोस्टींग मिल जाएगी.

**श्री.जावेद खान** : लेकिन सरकार ने तय कर लिया है कि यह सैशन खत्म होने के पहले इन दोनो टीचर्स को प्रिंसिपल की पोस्टींग मिला जाएगी और जो भी डिफरेंस होगा वह सब हो जाऐगा." *(पृष्ठ ८८)*

**५५.** एकदा विषय, संदर्भ व आश्वासनांचे तपशील समितीने निश्चित केले की, त्यानंतर विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे सुद्धा समितीला निश्चित करून द्यावे लागतात. उपरोक्त विषयाच्या बाबतीत उच्च शिक्षण विभागाने केलेल्या कारवाईच्या संदर्भात काही मुद्यांवर विभागाकडून माहिती मागविण्याचा निर्णय समितीने घेतला. याबाबतचा अधिकृत कार्यवृत्तातील भाग पुढीलप्रमाणे :-

"**४. माहिती मागवावयाचे मुद्दे**

१. संबंधित प्राध्यापकांना प्राचार्य पदावर पदोन्नती देण्याबाबतचे शासन आदेश प्रसृत करण्यात आलेले आहेत काय? असल्यास त्यांना कोणत्या तारखांपासून पदोन्नती दिलेली आहे, सदरहू आदेशाची प्रत.

२. प्रत्यक्ष पदोन्नतीचे आदेश प्रसृत होण्याच्या बराच काळ अगोदर पासून त्यातील काही प्राध्यापक प्रभारी प्राचार्य (ऑफीशिएटींग प्राचार्य) म्हणून काम करीत होते हे खरे आहे काय? तसेच महाराष्ट्र शासनातर्फे शिक्षकांकरिताचा राज्य पुरस्कार प्राप्त असल्यामुळे ३० एप्रिल १९८४ व १३ जून १९८५ च्या शासन आदेशान्वये दोन जादा वेतनवाढी त्यातील काहींना अनुज्ञेय आहेत हे खरे आहे काय?

३. ज्या तारखेपासून त्यांना प्राचार्य पदावर पदोन्नती देण्यात आली त्या तारखेपासून पदोन्नतीच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करून त्याची थकबाकी देण्याबाबतचे आदेश अकौटंट जनरलला देण्यात आलेले आहेत काय? असल्यास केव्हा व त्याची प्रत समितीकडे पाठवावी. नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहे." *(पृष्ठ ८९)*

समितीने त्याच दिवशीच्या बैठकीत १५ दिवसांच्या आत विभागाने माहिती पाठवावी असा निर्णय घेतला व त्याच दिवशीच्या बैठकीत उक्त विषयावर सचिव उच्च शिक्षण विभाग यांची साक्ष घेण्यात यावी असाही निर्णय घेतला.

**५६.** समितीने मागितलेली माहिती उच्च शिक्षण विभागाने समिती कार्यालयात दाखल केली. मागितलेल्या माहितीचा मुद्दा व त्यावर उच्च शिक्षण विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे :-

"**मुद्दा (१)** : संबंधित प्राध्यापकांना प्राचार्य पदावर पदोन्नती देण्याबाबतचे शासन आदेश प्रसृत करण्यात आलेले आहेत काय? असल्यास त्यांना कोणत्या तारखांपासून पदोन्नती दिलेली आहे, सदरहू आदेशाची प्रत.

**अभिप्राय** : संबंधित प्राध्यापकांना प्राचार्य पदावर पदोन्नती देण्याबाबतचे आदेश शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीपी-१०८८/६२८६९(३६२१) प्रशा-२, दिनांक ४.८.१९८८ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार श्री.काणे यांना दि. ३.१.८४ पासून व श्री.जोशी यांना दि. १.६.८४ पासून पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यात आले आहेत. (आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

**मुद्दा (२)** : प्रत्यक्ष पदोन्नतीचे आदेश प्रसृत होण्याच्या बराच काळ अगोदर पासून त्यातील काही प्राध्यापक प्रभारी प्राचार्य (ऑफीशिएटींग प्राचार्य) म्हणून काम करीत होते हे खरे आहे काय? तसेच महाराष्ट्र शासनातर्फे शिक्षकांकरिताचा राज्य पुरस्कार प्राप्त असल्यामुळे ३० एप्रिल १९८४ व १३ जून १९८५ च्या शासन आदेशान्वये दोन जादा वेतनवाढी त्यातील काहींना अनुज्ञेय आहेत हे खरे आहे काय?

**अभिप्राय** : प्रत्यक्ष पदोन्नतीचे आदेश निर्गमित होण्याआधी श्री.पी.एस.काणे हे प्रभारी प्राचार्य म्हणून विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे कार्यरत होते. राज्य पुरस्कार मिळाल्यामुळे श्री.काणे यांना देय असलेल्या २ आगाऊ वेतनवाढी देण्याबाबतचे आदेश शा.नि.शि. व से.वि. क्र. एससीटी-१०८९/६५२७३/(४५००) प्रशा-२, दि. ८.९.८९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

**मुद्दा (३)** : ज्या तारखेपासून त्यांना प्राचार्य पदावर पदोन्नती देण्यात आली त्या तारखेपासून पदोन्नतीच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करून त्याची थकबाकी देण्याबाबतचे आदेश अकौटंट जनरलला देण्यात आलेले आहेत काय? असल्यास केव्हा व त्याची प्रत समितीकडे पाठवावी. नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**अभिप्राय** : या अधिकाऱ्यांची मानीव दिनांकापासून नोशनल वेतनवाढीचा लाभ देऊन वेतननिश्चिती करण्यात आली आहे व त्याप्रमाणे महालेखाकार नागपूर यांनी शासनास कळविले आहे." *(पृष्ठ ६३९)*

**५७.** समितीच्या निर्णयाप्रमाणे शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष ही

आश्वासन समितीसमोर दिनांक १८ सप्टेंबर, १९८९ रोजी घेण्यात आली. त्या दिवशीच्या बैठकीला कोण कोण सदस्य उपस्थित होते व विधानमंडळ सचिवालय व शिक्षण विभाग यांच्यातर्फे कोण कोण अधिकारी उपस्थित होते याबाबतचा अधिकृत कार्यवृत्तातील भाग पुढीलप्रमाणे :-

"विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक सोमवार, दिनांक १८ सप्टेंबर, १९८९ रोजी दुपारी २.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे भरली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :-

**: उपस्थिती :**

१. श्री.बी.टी.देशमुख, वि.प.स. समिती प्रमुख

२. श्री.त्र्यं.गो.देशमुख, वि.प.स.

३. श्री.विजय सावंत, वि.प.स.

४. श्री.ज.य.टेकावडे, वि.प.स. (*89CACMP233*)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.वि.ग.कुलकर्णी, अवर सचिव

**शिक्षण विभाग**

श्री.व.र.द्रविड, सचिव (सामान्य शिक्षण)

श्रीमती कुमुद बन्सल, सचिव (उच्चशिक्षण व तंत्रशिक्षण)

श्री.पाटोळे, संचालक (उच्च शिक्षण)

श्री.व.ल.फातर्पेकर (उपसचिव, प्राथमिक शिक्षण विभाग)

श्री.का.पा.सोनवणे (उपसचिव, माध्यमिक शिक्षण विभाग)

श्री.झेड्. मुआलिम (उपसचिव, उच्च शिक्षण)" *(पृष्ठ २५०)*

"शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना सेवा जेष्ठतेप्रमाणे प्राचार्यपदी बढती देणे व क्लास वन दर्जा देणे" या विषयावरील १९८९ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांच्या संदर्भात **सचिव, शिक्षण विभाग यांनी दाखल केलेली कागदपत्रे आश्वासन समितीने, विभागांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सन १९८९ च्या पुस्तकामध्ये पृष्ठ ६३९ ते ६४३ वर समाविष्ट केलेली आहेत.**

**५८.** विभागाने सादर केलेल्या माहितीमध्ये पदोन्नती कोणत्या तारखेपासून दिलेली आहे. हे नमूद होते पण वेतननिश्चिती कोणत्या तारखेपासून देण्यात आली आहे याबाबत पुढीलप्रमाणे चर्चा झाली. :-

"**समिती प्रमुख** : आपण दिलेल्या माहितीप्रमाणे ३.१.८४ पासून आणि १.६.८४ पासून पदोन्नती व मानीव दिनांक देण्यात आला आहे. परंतु त्या तारखेपासून वेतननिश्चिती देण्याचे आदेश दिलेले आहेत काय?

**श्रीमती बन्सल :** मानीव दिनांकापासून नोशनल वेतनवाढीचा लाभ देऊन वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे. महालेखाकार नागपूर यांनी १०.१०.८८ ला कळविले आहे."

**५९.** नेमलेल्या तारखेपासून त्यांना सर्व लाभ देण्यात येतील असे सभागृहात आश्वासन देण्यात आले होते. राज्य पुरस्कारापोटी मिळणाऱ्या जादा वेतनवाढीच्या लाभाचा सुद्धा त्यात समवेश होतो. त्याबाबत चर्चा पुढीलप्रमाणे झाली. :-

"**समिती प्रमुख** : सभागृहांमध्ये असे आश्वासन दिलेले आहे की, त्या तारखेपासूनचे सर्व लाभ त्यांना देऊ. ते दिलेले आहेत काय?

**श्रीमती बन्सल :** श्री.काणे यांना राज्य पुरस्कार मिळाल्यामुळे देय असलेल्या दोन आगाऊ वेतनवाढी देण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत.

**समिती प्रमुख** : आगाऊ वेतनवाढीचे आदेश केव्हा काढले?

**श्रीमती बन्सल** : ते आदेश दिनांक ८.९.१९८९ ला काढलेले आहेत.

**समिती प्रमुख :** दि.४ ऑगस्ट १९८८ च्या आदेशाची प्रत आमच्याकडे आलेली आहे. दि.८.९.८९ च्या आदेशाची प्रत आमच्याकडे पाठविली आहे काय?

**श्रीमती बन्सल** : आपल्याकडे प्रत पाठविली नसेल तर ती पाठवू." *(पृष्ठ २५२)*

**६०.** थकबाकीबाबत महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतसुद्धा चर्चा झाली. ती पुढीलप्रमाणे :-

"**समिती प्रमुख** : दि.८.९.८९ च्या आदेशाची प्रत आपण पाठवावी. आपण राज्य पुरस्कारामुळे दोन आगाऊ वेतनवाढीचे आदेश काढलेले आहेत. मुख्य मुद्दा असा आहे की, महालेखाकार नागपूर यांनी आपल्याकडे असे कळविले की, मधल्या ॲरीअर्सचे काय करावयाचे ते आपण कळविलेले नाही. त्याबाबतीतील कंप्लायन्स आपल्याला करता येईल. आणि ते देत असताना सभागृहामध्ये दिलेले जे आश्वासन आहे ते लक्षात घेऊनच आपण तो कंप्लायन्स द्यावा. सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनामध्ये असे म्हटले आहे की, त्यांना सर्व फायदे दिले जातील. मी असे समजतो की, आपल्याला याबाबतची माहिती घेणे या ठिकाणी थांबविता येईल. एका बाबतीत कंप्लायन्स झालेला आहे. ज्या तारखेपासून त्या पदावर काम करीत होते त्या तारखेपासून आपण फायदा देऊ शकतो की नाही याबाबतीत आपण कंप्लायंस द्यावा.

**श्रीमती बन्सल** : ठीक आहे." *(पृष्ठ २५२)*

**६१.** विधिवतरित्या अनुज्ञेय असलेले लाभ शिक्षकांना किंवा कर्मचाऱ्यांना लागू करतांना उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी आम्ही म्हणू त्याला देऊ, पूजाअर्चा बरोबर केली नाही तर आम्ही ते लाभ देणार नाही, उच्च न्यायालयातून जरी अनेकांनी न्याय मिळविला तरी त्यातील काहींना आम्ही देऊ, पण इतर काहींच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात पूनर्विलोकन याचिका दाखल करून 'पूजाअर्चा' करण्यासाठी अशा अर्जदाराला जेरीस आणू, अधिकाऱ्यांची ही वृत्ती स्पष्ट करणारी डझनावारी प्रकरणे दाखवून देता येतील. विधिवतरित्या अदेय असलेले लाभसुद्धा मंत्रिमंडळाची मान्यता नसली तरी, वित्त विभागाची मान्यता नसली तरी, आम्ही वाटेल त्या अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला देऊ शकतो, **ही उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांची मुजोरी वृत्ती बक्षी समितीच्या अहवालामुळे ठसठशीतपणे जगाच्या समोर आली. सहाव्या वेतन आयोगाने मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांपेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणात अतिप्रदान करण्याची बहादुरी उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी दाखविलेली होती.** याबाबतीत बक्षी समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट असलेला परिच्छेद ४.६.३ मी जसाच्या तसा उधृत करीत आहे :-

"**(४.६.३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग (अकृषी विद्यापीठे) :** सर्व विद्यापीठांत शिक्षकेतर पदांच्या ६ व्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांची तपासणी करून संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून **झालेले अतिप्रदान वसूल करण्याची शिफारस करण्यात येत आहे.** तसेच योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ **व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक ७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस समिती करीत आहे.**"

**६२.** उच्च शिक्षण विभागातील कर्त्यामंडळींच्या या वृत्तीचा अनुभव उच्च शिक्षण क्षेत्राला गेले अनेक वर्षे ठायी ठायी येत आहे असे आपल्याला दिसून येईल. प्राचार्य श्री.प.सि.काणे यांच्या प्रकरणामध्ये सुद्धा या वृत्तीचा चमत्कार खुप मोठ्या व विकृत स्वरूपामध्ये पहायला मिळाला. कसे ते पहा. मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणामध्ये दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी जो निर्णय दिला त्यातील आदेशाचा भाग पुढीलप्रमाणे :-

"The Petitioner P.S.Kane in Writ Petition No. 751 of 1985 shall also be promoted to the post of Principal by showing him senior to Mr.P.L.Mishra."

**६३.** दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी झालेल्या या निर्णयाच्या बाबतीत उच्च शिक्षण विभागाने काय उजेड पाडला? गुरुवार, दिनांक २१ जुलै १९८८ रोजी लक्षवेधी सूचनेवरील उच्च शिक्षण विभागाकडून तयार होऊन आलेल्या व सभागृहाला सादर झालेल्या लेखी निवेदनातील शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"डॉ.पी.एल्.मिश्रा यांना दिनांक १८ जून १९६८ पासून प्राध्यापक पदावर पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याचे शासनाने प्रस्तावित केले असून त्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेला आहे. आयोगाचा अभिप्राय प्रतिक्षाधीन आहे. आयोगाचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सर्वश्री काणे व जोशी यांना प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्याचा विचार करण्यात येणार आहे. वरील परिस्थितीमुळे जरी उच्च न्यायालयाने सर्वश्री काणे व जोशी यांच्या बाजूने निकाल दिला असला तरी शासनातर्फे उचित कार्यवाही करता आली नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : गुरुवार, दिनांक २१ जुलै १९८८ : खंड ८३, क्रमांक ८, पृष्ठ ६६-६७)*

**६४.** मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला असतांना त्याची अंमलबजावणी न करण्याची उच्च शिक्षण विभागाने नमूद केलेली कारणे किती पोकरट व अज्ञानमूलक तसेच अहंकारयुक्त आहे हे पाहण्यासारखे आहे.

(१) "प्रा.पी.एल.मिश्रा यांना १८ जून १९६८ पासून प्राध्यापक पदावर

# लढवय्या गुरुवर्य - विशेषांक

पदोन्नतीचा मानीव देण्याचे शासनाने प्रस्तावित केलेले आहे"

(२) "तो प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेला आहे."

(३) "आयोगाचा अभिप्राय प्रलंबित आहे."

(४) आयोगाचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सर्वश्री काणे व जोशी यांना प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्याचा विचार करण्यात येणार आहे."

(५) "वरील परिस्थितीमुळे जरी उच्च न्यायालयाने सर्वश्री काणे व जोशी यांच्या बाजूने निकाल दिलेला असला तरी शासनातर्फे उचित कार्यवाही करता आली नाही."

**६५.** दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी मा.उच्च न्यायालयाने "The Petitioner P.S.Kane in Writ Petition No. 751 of 1985 shall also be promoted to the post of Principal by showing him senior to Mr.P.L.Mishra." असा निर्णय दिलेला असतांना सहा महिन्यानंतर दिनांक २१ जुलै १९८८ रोजी सभागृहात सादर केलेल्या लेखी निवेदनात "**डॉ.पी.एल्.मिश्रा यांना दिनांक १८ जून १९६८ पासून प्राध्यापक पदावर पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याचे शासनाने प्रस्तावित केले असून त्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेला आहे. आयोगाचा अभिप्राय प्रतिक्षाधीन आहे. आयोगाचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सर्वश्री काणे व जोशी यांना प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्याचा विचार करण्यात येणार आहे.**" (परिच्छेद ४६ पहा) अशी भूमिका अधिकृतपणे सभागृहासमोर ठेवण्यात आली. याचा अर्थ उपरोक्त विचार मा.उच्च न्यायालयाचा दर्जा व लोकसेवा आयोगाचा दर्जा या विषयी भारताच्या घटनेने ठरवून दिलेल्या स्थितीविषयी अज्ञान दर्शविणारा आहे किंवा उभयपक्षाकडून अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करता येते काय? याचा प्रयत्न करणारा आहे.

**६६.** या लेखी निवेदनात आणखी पुढे असा उल्लेख आहे की, "**वरील परिस्थितीमुळे जरी उच्च न्यायालयाने सर्वश्री काणे व जोशी यांच्या बाजूने निकाल दिलेला असला तरी शासनातर्फे उचित कार्यवाही करता आली नाही.**" अशी भूमिका सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या निवेदनामध्ये घेणे हे केवळ पोरकटपणाचे नव्हे तर सामान्य ज्ञानाचा सुद्धा अभाव असल्याचे लक्षण म्हणता येईल. कोणकोणत्या परिस्थितीमध्ये उच्च न्यायालयाच्या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाला उचित कार्यवाही करता येणार नाही हे उच्च न्यायालयाला कळविण्यात येत आहे. असा उल्लेख या निवेदनात नव्हता ही मात्र उच्च शिक्षण विभागाची बुद्धीमत्तापूर्ण कृती होय.

**६७.** सभागृहामध्ये उच्च शिक्षण विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या लेखी निवेदनातील शेवटचे वाक्य पुढीलप्रमाणे :-

"दिनांक २५ फेब्रुवारी १९८८ रोजी निकाल दिला असला तरी त्या निकालाची प्रमाणित प्रत १६ जून १९८८ रोजी शासनास प्राप्त झाली. ही वस्तुस्थिती उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे." (परिच्छेद ४६ पहा)

"नागपूर खंडपीठाचा निर्णय उच्च शिक्षण विभागामध्ये मुंबई येथे उपलब्ध होण्यासाठी या दोन शहरातील ७००-८०० किलोमीटरचे अंतर लक्षात घेता उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत मिळण्यास विलंब लागणे स्वाभाविक आहे" असे वाक्य या निवेदनात आले नाही हे मा.उच्च न्यायालयाचे भाग्यच म्हटले पाहिजे.

**६८.** "शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतलेला आहे" हा अनेक प्रकरणी वापरण्यात येत असलेला हातखंडा प्रयोग अंमलात आणण्याचा उच्च शिक्षण विभागाचा प्रयत्न अगोदरच्या दिवशी अयशस्वी झाला होता. अगोदरच्या दिवशी 'ब्रिफींग'साठी मा. उच्च शिक्षणमंत्री व राज्यमंत्री अधिकाऱ्यांच्या समवेत बसले होते. तेथे उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष अनुमती याचिकेचा मुद्दा चर्चेस घेतला असता उभय मंत्र्यांनी ती गोष्ट फेटाळून लावली असे मला समजले होते. म्हणून मी मुद्दामच "सर्वोच्च न्यायालयात अपील करावयाचे नाही असा निर्णय काल घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय?" असा प्रश्न विचारला असता मा.राज्यमंत्र्यांनी त्यावर "होय" असे उत्तर दिले. *(परिच्छेद ४८ (iv) पहा)*

**६९.** नुटा बुलेटीनला ५० वर्षे पूर्ण होत आहेत, त्या निमित्ताने नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका प्रकाशित करण्याचा निर्णय नुटाच्या आमसभेने घेतला आहे. दिनांक ३० जून २०२४ रोजी झालेल्या सभेत विषय क्रमांक ८७२ अन्वये "नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका" या मथळ्याचा एक ठराव संमत करण्यात आला असून त्या ठरावातील परिच्छेद ३ (तीन) पुढीलप्रमाणे आहे :-

"**तीन : विधिमय मार्गाने प्रश्न सुटू शकतात याची माहिती देणारे विशेषांक** : गेल्या काही वर्षामध्ये असे आढळून आलेले आहे की, संचालक, सहसंचालक उच्च शिक्षण विभाग व खुद्द उच्च शिक्षण विभाग यामध्ये लाचलुचपतीची प्रकरणे फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहेत. प्रत्यक्ष लाचलुचपत करतांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने पकडलेल्या अधिकाऱ्यांची संख्या ही डोळ्यात भरण्यासारखी असली तरी न पकडल्या गेलेल्या अधिकाऱ्यांची संख्यासुद्धा बरीच मोठी आहे. अशा परिस्थितीमध्ये भ्रष्टाचारी मार्गाचा वापर न करता निर्धारपूर्वक विधिमय मार्गानेच आपला प्रश्न सुटला पाहिजे यासाठी कष्टपूर्वक प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांची संख्या सुद्धा आज अभिमान वाटावा अशी आहे. संघटनेने सुद्धा याबाबतीत ठामपणे धोरणात्मक निर्णय घेतले असून त्याची दृढतापूर्वक अंमलबजावणी करण्यात येत आहे. विधिमय मार्गाने सुटलेल्या अशा प्रश्नांविषयीचे विशेषांक प्रकाशित करणे हा नुटा बुलेटीन सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिकेचा एक महत्त्वाचा भाग असेल."

अनेक शिक्षकांनी संघटितरित्या एकत्र येऊन मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयातून न्याय मिळविल्याची अनेक प्रकरणे संघटनेच्या दप्तरी उपलब्ध आहेत. त्यातील काही प्रकरणी विशेषांक निघालेसुद्धा आहेत. शासकीय महाविद्यालयातील एक शिक्षक तीन वेळा उच्च न्यायालयात व एक वेळ सर्वोच्च न्यायालयात धडक देऊन चिकाटीने प्रदीर्घ काळ संघर्ष करून विधिमय मार्गाने न्याय मिळवितो असे उदाहरण आपल्या गुरूवर्यांचेच आहे हे लक्षात आल्याने हा लेखन प्रपंच.

**७०.** सन १९६६ च्या वेतनश्रेण्यांच्या रचनेतून उद्भवलेल्या विकृतींच्या विरोधातील हा संघर्ष सन १९८८ पर्यंत म्हणजे जवळ जवळ २०-२२ वर्षे चालला. या सर्व कालखंडामध्ये अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करण्याचे अनेक प्रयत्न मंत्रालयातून अनेकांच्या बाबतीत होत होते व त्याचे लाभधारक सुद्धा विपूल होते. मुद्दामहून याच विषयावर चर्चा करण्यासाठी कोणी आले असल्यास गोष्ट वेगळी, अन्यथा काणे सरांनी आपल्यावर होणाऱ्या या आघाताविषयीची लहानशी सुद्धा अप्रसन्नता आपल्या सहकाऱ्यांसमोर या प्रदीर्घ काळात व्यक्त केल्याचे दिसून आले नाही. अत्यंत प्रसन्नतापूर्वक या संघर्षाला तोंड दिले. "प्रसन्नतेपुढें सर्व दुःखें जाती झडुनिया, प्रसन्नतेनें बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे" या गीताईने केलेल्या उपदेशाप्रमाणे प्रसन्न मनाने त्यांनी हा संघर्ष पूर्णत्वास नेला व १०० टक्के विधिमय मार्गाने त्यात उत्तम यश मिळविले. आज वयाची ९२ वर्षे त्यांनी पूर्ण केलेली आहेत. उच्च दर्जाची स्मरणशक्ती व उत्तम आरोग्यासह एवढा लांब पल्ल्याचा प्रवास पूर्ण करण्याचे रहस्यसुद्धा त्यांच्या या प्रसन्नतेने भारलेल्या व्यक्तिमत्त्वात आहे असे मला नेहमीच वाटत आले आहे. त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने अशाच प्रसन्न प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

## नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका
## विशेषांक पाचवा

# चौथ्या वेतन आयोगाची अंमलबजावणी व प्राचार्य प.सि.काणे

**७१.** चौथ्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळी विदर्भ महाविद्यालय, अमरावती या शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून विद्यापीठाच्या स्थान निश्चयन समितीमध्ये (Placement Committee) संचालकांचे प्रतिनिधी या नात्याने जे कार्य प्रा.प.सि.काणे यांनी केले ते तसे त्यांनी करणे हे उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक यांना आवडले नाही. ही बाब तपशिलाने समजून घ्यावयाची तर त्यासाठी कार्य मूल्यांकन समिती (Assessment Committee) व स्थान निश्चयन समिती (Placement Committee) ह्या दोन समित्या व त्यांचे कार्य हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.

**७२.** पूर्वीची ३००-६०० ही मूळ वेतनश्रेणी, ४००-८०० ही वरिष्ठ श्रेणी व ७००-११०० ही वरिष्ठ अधिव्याख्याता वेतनश्रेणी अशी त्रिस्तरीय वेतनव्यवस्था बाजूला ठेवून Rs.700-40-1100-50-1300-Assessment-50-1600 ही एकच धावती वेतनश्रेणी तिसऱ्या आयोगाच्या वेळी निश्चित झाली. अधिव्याख्याता १३०० च्या स्तरावर पोहचला म्हणजे त्याच्या कामाचे समितीमार्फत मूल्यमापन करावे व मगच त्याला त्या वेतनश्रेणीत पुढची चाल मिळेल. हे काम विद्यापीठ स्तरावरच्या कार्य मूल्यांकन समितीकडे (Assessment Committee) शासननिर्णयाने सोपविले होते. या समितीवर एका व्यक्तीला नामित करण्याचा उच्च शिक्षण संचालकांना अधिकार होता.

**७३.** नागपूर विद्यापीठामध्ये त्यावेळी विदर्भातील सर्व जिल्ह्यांचा समावेश होता. या सर्व जिल्ह्यांतील अधिव्याख्यात्यांचे काम हे नागपूर विद्यापीठाच्या असेसमेंट कमिटीमार्फत केल्या जात होते. दिनांक १ मे १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. अमरावती विद्यापीठाचे तात्पूरते कार्यालय विदर्भ महाविद्यालय या शासकीय महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सुरू झाले. पण या काळामध्ये अमरावती विद्यापीठाच्या भागातील अधिव्याख्यात्यांचे असेसमेंट हे नागपूर विद्यापीठाच्या समितीकडेच चालू राहिले. काही दिवसांनी याबाबत असंतोष व्यक्त व्हायला लागला.

**७४.** दिनांक २१ एप्रिल १९८४ रोजी एस.पी.एम. गिलाणी कॉलेज, घाटंजी येथे झालेल्या नुटाच्या आमसभेमध्ये प्रा.राम काकाणी यांनी मांडलेला प्रस्ताव विषय क्रमांक ८ वर आमसभेने विचारात घेतला व संमत केला. तो पुढीलप्रमाणेः-

"स्वतंत्र अमरावती विद्यापीठाची स्थापना होऊन देखील अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचे मूल्यमापन (असेसमेंट) नागपूर विद्यापीठाच्या या कार्याकरिता नियुक्त समितीकडूनच केले जावे असे निर्देश दिल्या गेले आहेत. अमरावती विद्यापीठाने आपली ही जबाबदारी नागपूर विद्यापीठावर न ढकलता यासाठी आवश्यक समिती नियुक्त करावी अशी विनंती नुटाची ही आमसभा अमरावती विद्यापीठास करीत आहे."

**७५.** मी त्यावेळेला अमरावती विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य होतो. कार्यकारी मंडळामध्ये चर्चा होऊन हे काम अमरावती विद्यापीठाच्या स्तरावर पार पाडण्यास सुरुवात करावी असा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार दिनांक ६ फेब्रुवारी १९८५ रोजी अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांनी उच्च शिक्षण संचालकांना "Assessment of Teachers at the stage of 1300/- in the scale 700-1600" या विषयावर एक पत्र (No. AU/6/Assessment/7167/85) पाठविले. या पत्रान्वये उच्च शिक्षण संचालकांना "Name of the representative of Director of Education, Higher Education may also be sent as early as possible." अशी विनंती केली होती.

**७६.** या पत्राला उत्तरादाखल उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक ११ मार्च १९८५ रोजी पत्र पाठवून "**शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य हेच उच्च शिक्षण संचालकांचे नामित सदस्य म्हणून असेसमेंट कमिटीमध्ये काम करतील**" असे कळविले. पूर्वी उच्च शिक्षण संचालकांचे प्रतिनिधी म्हणून विदर्भ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.ढमढेरे हे या समितीमध्ये काम करीत असत. त्यानंतर प्राचार्य पदाचा कार्यभर प्रा.काणे यांच्याकडे आल्यामुळे प्रा.काणे त्या समितीवर उच्च शिक्षण संचालकांचे नामित प्रतिनिधी म्हणून कार्य करित राहिले. जवळ जवळ सन १९८४ पासून तर १९८९, १९९० पर्यंत हीच व्यवस्था सुरू होती.

**७७.** चौथ्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांचा शासननिर्णय निर्गमित झाला व त्यानुसार २२००-४००० ही मूळ वेतनश्रेणी, ३०००-५००० ही वरिष्ठ वेतनश्रेणी व ३७००-५७०० ही निवडश्रेणी अशी त्रिस्तरीय वेतनश्रेण्यांची व्यवस्था अस्तित्वात आली. वरिष्ठ श्रेणीमध्ये व निवडश्रेणीमध्ये याबाबतच्या सर्व अटी लक्षात घेऊन **स्थाननिश्चिती करण्याची जबाबदारी ही विद्यापीठ स्तरावरील अस्तित्वात असलेल्या 'असेसमेंट कमिटी'ने यापुढे 'प्लेसमेंट कमिटी' म्हणून काम करावे व पार पाडावी असे शासननिर्णयात नमूद होते.**

**७८.** प्रत्यक्ष हा शासननिर्णय निर्गमित होण्यापूर्वी उच्च शिक्षण सचिवांचा असा आग्रह होता की, शिक्षकांचा कार्यभार ठरविण्याबाबत उच्च शिक्षण विभागाला अधिकार असला पाहिजे. कार्यभारामध्ये वाढ करण्याच्या हेतूने हा त्यांचा प्रस्ताव होता. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची त्याबाबतीत भूमिका अशी होती की, कार्यभाराविषयीची बाब ही राज्यशासनाच्या अत्युच्च स्तरावर बैठक होऊन १० वर्षांपूर्वी निश्चित झालेली आहे. त्या बैठकीला राज्याचे मा.मुख्यमंत्री, अर्थमंत्री, शिक्षणमंत्री, शिक्षण सचिव, अर्थ सचिव, सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व महासंघाचे कार्यकारी मंडळ उपस्थित होते. "यूजीसीच्या सूचना लक्षात घेऊन त्यावेळेला कार्यभार निश्चितीबाबत मतैक्य झाले. त्या मतैक्यपत्राच्या आधारावर शासनाने उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याचिका मागे घेतली. १० वर्षापूर्वी कार्यभाराचे तपशील सर्वोच्च स्तरावर ठरलेले असतांना आता पुन्हा उच्च शिक्षण सचिव हा मुद्दा का उकरून काढत आहेत?" असे महासंघाचे म्हणणे होते. मा.मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे म्हणणे मान्य केले. उच्च शिक्षण सचिवांचा त्यामुळे बराच तीळपापड झाला व शासननिर्णयाची अंमलबजावणी करतांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी कोणालाही मिळणार नाही या विषयीच्या कारस्थानाला त्यांनी सुरुवात केली.

**७९.** उच्च शिक्षण संचालक व सहसंचालकांना त्यादृष्टीने सचिवांनी सूचना दिल्या. अमरावतीच्या सहसंचालकांनी दिनांक २१ जून १९८९ रोजी एक परिपत्रक *(137/21)* काढले व "**तुर्त अधिव्याख्यात्यांची वेतननिश्चिती २२००-४००० या वेतनश्रेणीमध्येच करावयाची आहे**" असे सर्व महाविद्यालयांना कळविले. दिनांक ११ जुलै १९८९ रोजी नागपूर विभागाच्या सहसंचालकांनी एक परिपत्रक *(138/21)* काढले. त्याद्वारे "**शासननिर्णयामध्ये जरी तीन वेगवेगळ्या वेतनश्रेण्या मंजूर केलेल्या असल्या तरी प्रथम अधिव्याख्यात्यांची वेतननिश्चिती रुपये २२००-४००० या वेतनश्रेणीमध्येच करावयाची आहे.**" असे सर्व महाविद्यालयांना कळविले. ही दोनही परिपत्रके शासननिर्णयाच्या विरोधात होती व सचिवांनी/उच्च शिक्षण संचालकांनी दिलेल्या तोंडी आदेशावर काढण्यात आलेली होती. दिनांक ८ ऑगस्ट १९८९ रोजी विधानपरिषद सभागृहामध्ये झालेल्या खडाजंगी चर्चेनंतर ती दोनही परिपत्रके रद्द करण्याचा निर्णय शासनाने सभागृहात घोषित केला.

**८०.** त्यानंतर उच्च शिक्षण संचालकांचे प्रतिनिधी असेसमेंट/प्लेसमेंट कमिटीवर पाठविले जातील तेव्हा त्यांच्या मार्फत दोन रिफ्रेशर कोर्सेस केल्याशिवाय वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करावयाची नाही अशाप्रकारच्या सूचना त्यांना देण्यात याव्यात असा कट ठरला. अशी सूचना सुद्धा शासननिर्णयाच्या विरोधात होती कारण रिफ्रेशर कोर्सेस ज्या विद्यापीठांमध्ये यापूर्वी आयोजित झालेले नसतील तेथे ते क्षमापित करण्याचा अधिकार त्या त्या विद्यापीठाला होता. त्याप्रमाणे सर्वच विद्यापीठांनी क्रमशः तसे निर्णय घेतले. याबाबतचा सर्वप्रथम निर्णय अमरावती विद्यापीठामध्ये झाला. कार्यकारी मंडळाच्या बैठकीची वाट न पाहता मा.कुलगुरूंनी याबाबत दिनांक ३०.०८.१९८९ रोजी विद्यापीठ कायद्यातील कलम ११(४) अन्वये याबाबतचे निदेश *(154/21)* निर्गमित करून दोन रिफ्रेशर कोर्सेसची अट शिथील केली. त्यामुळे प्लेसमेंट कमिटीचे काम जोरात सुरू झाले. या कमिटीवर संचालकांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य श्री.प.सि.काणे हे कार्यरत होते.

**८१.** अमरावती विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करण्याचे काम जोरात सुरू झाले व संपले सुद्धा. त्यामुळे सचिवांच्या अंगाचा तीळपापड झाला. अमरावती विद्यापीठाने संचालकांचा प्रतिनिधी न मागता हे काम कसे काय पार पाडले? याविषयी विद्यापीठाच्या कुलसचिवांकडून फोनवरून माहिती घेण्यात आली. त्यावेळेला संचालकांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य श्री.प.सि.काणे हे बैठकांना हजर होते ही गोष्ट सचिवालयात व उच्च शिक्षण संचालनालयात ज्ञात झाली. आपण प्रतिनिधी म्हणून कोणालाही नेमलेले नसतांना प्राचार्य प.सि.काणे यांनी कसे काय काम केले? याबद्दल त्यांच्याकडून स्पष्टीकरण (Explanation) मागण्यात यावे असा निर्णय तेथे झाला. संचालकांनी तशा अर्थाचे पत्र प्राचार्य काणे यांना पाठविले.

**८२.** "शासकीय महाविद्यालयात जे कोणी प्राचार्य असतील तेच संचालकांचे या समितीवर प्रतिनिधी असतील" या अर्थाचे उच्च शिक्षण संचालकांचे १९८५

मध्येच पत्र आले होते ही गोष्ट आम्हा सर्वांनाच ठाऊक होती. त्याप्रमाणे प्राचार्य श्री.ढमढेरे व त्यानंतर प्राचार्य श्री.प.सि.काणे हे गेली काही वर्षे त्या समितीवर काम करीत होते. वेगळ्या पत्राची कोणाला गरज वाटली नव्हती. पण आता स्पष्टीकरण देण्याचा प्रश्न आल्यामुळे नुसते ठाऊक असण्याचा हा प्रश्न राहिला नव्हता तर आता ही कागदपत्रांची लढाई झालेली होती. प्राचार्य काणे यांनी विदर्भ महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या कार्यालयामध्ये चार-पाच वर्षे अगोदर आलेल्या त्या पत्राची प्रत हुडकून काढली. ते पत्र शब्दशः पुढीलप्रमाणे होते. :-

"No.RSP/1985/14070/Amravati University
Directorate of Education (H.E.)
Maharashtra State, Pune-1
**Dated : 11.03.1985**

To,
The Registrar,
Amravati University, Amravati.

**Subject :** Assessment of Teachers at the stage of 1300/- in the scale of Rs. 700-1600/-

Reference : Your letter No. AU/6/Assessment/7167/85 dated 06.02.1985.

Sir,

University Concerned is to decide mode of assessment.

**If the Directorate of Education's (H.E.) nominee is necessary the name of the nominee is Principal of Government College in the Region.**

Yours faithfully,

Sd/-
for Director of Education (H.E.)
M.S. Pune-1"

स्पष्टीकरण मागणाऱ्या सहसंचालकांच्या पत्राला प्राचार्य काणे यांनी चपखल उत्तर दिले. आपल्या स्पष्टीकरणात्मक निवेदनासोबत ११.०३.१९८५ च्या संचालकांच्या पत्राची प्रत जोडून "उच्च शिक्षण संचालकांच्या त्या आदेशान्वये विद्यापीठाच्या असेसमेंट/प्लेसमेंट कमिटीवर काम करणे हा माझ्या कर्तव्याचा भाग होता व ते मी त्याप्रमाणे पार पाडलेले आहे. त्या समितीमध्ये शासननिर्णयाप्रमाणेच काम होईल याची मी काळजी घेतली आहे." असे स्पष्टीकरणात्मक निवेदन उच्च शिक्षण संचालकांकडे पाठविले.

**८३.** याच काळामध्ये दिनांक १६ सप्टेंबर १९८९ रोजी उच्च शिक्षण सहसंचालकांनी एक पत्र अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांना पाठविले. या पत्रामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "वर नमूद केलेल्या असेसमेंट कमिट्यांवर/निवड समित्यांवर शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांच्या प्रतिनिधीच्या नावाच्या मागणीबाबत अद्यापही आपल्याकडून या कार्यालयाकडे प्रस्ताव आलेला नाही. तरी कृपया हे पत्र मिळताच मागणीपत्र व सविस्तर प्रस्ताव तातडीने पाठवावा ही विनंती."

**८४.** आपल्याच कार्यालयाने ११.०३.१९८५ रोजी काय पत्र पाठविले आहे? हे न पाहता सहसंचालकांनी १६.०९.१९८९ चे पत्र पाठविण्याचा हा उपद्व्याप केलेला होता. अमरावती विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाची बैठक बोलाविण्यात आली. संचालकांच्या या पत्राचा दिनांक ५ ऑक्टोबर १९८९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विचार करण्यात आला. "त्यांच्या पत्रातील सर्वच परिच्छेद मूळ शासननिर्णयाशी विसंगत आहेत" असा ठराव कार्यकारी मंडळाने संमत केला. "अमरावती विद्यापीठाच्या विद्यमान असेसमेंट कमिटीवर शिक्षण संचालकांनी आपला स्थायी प्रतिनिधी दिनांक ११ मार्च १९८५ रोजीच्या पत्रान्वये पदपरत्वे नेमलेला असतांना व गेली ३-४ वर्षे तो प्रतिनिधी स्थायी प्रतिनिधी या नात्याने तेथे काम करीत आहे याचे भान सुद्धा संचालकांना राहिले नाही" असा ठराव याबाबतीत कार्यकारी मंडळाने संमत केला. हा विषय पुढे विधानपरिषद सभागृहामध्ये चर्चेला आला त्यावेळेला डायरेक्टरने जे पत्र पाठविले आहे ते आम्ही मागे घेत आहोत असे शासनातर्फे सांगण्यात आले.

**८५.** नागपूर व अमरावती येथील दोनही शासकीय महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आमच्या आदेशाशिवाय तुम्ही विद्यापीठाच्या असेसमेंट कमिटीवर कसे काय काम करित आहात? याबाबतचा खुलासा मागणारी पत्रे पाठविण्यात आली होती. हे पूर्णपणे चुकीचे काम असल्यामुळे ती पत्रे मागे घेण्यात येतील काय? अशी मागणी केली असता **"डायरेक्टर का जो भी पत्र है वह हम विड्रॉ कर लेंगे"** असे उत्तर राज्यमंत्र्यांनी दिले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** मग माझे म्हणणे असे आहे की, अशीच आणखीही काही सत्कार्ये या पत्रा बाहेर त्या सहसंचालकांनी केलेली आहेत. तेव्हा त्या दोन्ही ठिकाणचे लेखी व तोंडी खुलासा विचारणारे आदेश जे आहेत ते रद्द केले जाणार आहेत काय ?

**प्रा.जावेद खान :** अध्यक्ष महोदय, **डायरेक्टर का भी जो पत्र है वह हम विड्रॉ कर लेंगे**" *(महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही : शुक्रवार, दिनांक २० ऑक्टोबर १९८९ : अधिकृत प्रतिवेदन : खंड ८७, क्रमांक ५, पृष्ठ ४१)*

**८६.** अमरावती विद्यापीठाने रिफ्रेशर कोर्सेसची अट शिथिल करण्याचे निदेश ३०.०८.१९८९ रोजी निर्गमित केल्यानंतर त्याच्या प्रती सोबत घेऊन 'नुटा'च्या पदाधिकाऱ्यांनी नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंची औपचारिक भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. **दिनांक २२ सप्टेंबर, १९८९ रोजी नागपूर विद्यापीठाने याबाबतचे यथोचित निदेश निर्गमित केले.** दिनांक १८ ऑक्टोबर, १९८९ रोजी मुंबई विद्यापीठाने व त्यानंतरच्या काळात पुणे व मराठवाडा विद्यापीठाने निदेश निर्गमित केले. याबाबतीत सर्वात जास्त त्रास हा कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंनी दिला. त्यांच्या कृतीमुळे त्यांनासुद्धा प्रचंड असंतोषाला सामोरे जावे लागले. उच्च शिक्षण सचिवांचे आपण जणू काही गुलाम आहोत या भावनेने स्वविवेक न वापरता एखाद्या आज्ञाधारक शिपायासारखे तेथील कुलगुरूंनी वर्तन केल्यामुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला. सुटाच्या नेतृत्त्वाखाली व प्रा.संभाजीराव जाधव यांच्या मार्गदर्शनात धरणे, निदर्शने, मोर्चे, निषेध सभांचे आयोजन या मार्गाने हा असंतोष व्यक्त होऊ लागला. **शेवटी म्हणजे दिनांक २ डिसेंबर, १९८९ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंनी निदेश निर्गमित केले.**

एखाद्या विद्यापीठाचा कुलगुरू, उच्च शिक्षण सचिव व संचालकांच्या तोंडी आज्ञेचे एखाद्या शिपायाप्रमाणे पालन करीत असतांना प्राचार्य प.सि.काणे यांनी धैर्यपूर्वक प्लेसमेंट कमिटीवर सदस्य म्हणून कार्य पार पाडले. त्यांचे हे धैर्यपूर्ण वर्तन या भागातील महाविद्यालयीन क्षेत्रामध्ये आदरार्थी चर्चेचा विषय ठरले होते. नुटाच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांनी त्यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले होते.

## नुटा बुलेटीनची रजत महोत्सवी विशेषांक मालिका

'नुटा बुलेटीन'च्या प्रकाशनाला २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नुटा बुलेटीन रजत जयंती विशेषांक मालिकेचे प्रकाशन त्यावेळेला करण्यात आले होते. व्यावसायिक जीवनाशी संबंधित २६ विशेषांक त्यावेळेला प्रकाशित करण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे:-

**(१)** विशेषांक पहिला, सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ **महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४** विशेषांक पृष्ठ ११३ ते १५२

**(२)** विशेषांक दुसरा, 'नुटा बुलेटीन' (१९७६ ते २०००) **अनुक्रमणिका - विशेषांक** पृष्ठ १५३ ते २०४

**(३)** विशेषांक तिसरा, **शिक्षणाचे वाटोळेकरण - विशेषांक** पृष्ठ २०५ ते २३२

**(४)** विशेषांक चौथा, **नेट/सेट - विशेषांक** पृष्ठ २३३ ते ३२४

**(५)** विशेषांक पाचवा, **'वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सुविधा'** विशेषांक पृष्ठ ३२५ ते ३६४

**(६)** विशेषांक सहावा, **सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना** विशेषांक पृष्ठ ३६५ ते ४३२

**(७)** विशेषांक सातवा, **रजा प्रवास सवलत विशेषांक** पृष्ठ ४३३ ते ४८०

**(८)** विशेषांक आठवा, **वेतन अनुदान व्यवस्था विशेषांक** पृष्ठ ४८१ ते ५०८

**(९)** विशेषांक नववा, **संघटना - संस्थापना विशेषांक** पृष्ठ ५०९ ते ५३६

**(१०)** विशेषांक दहावा, **महत्वपूर्ण दस्तऐवज विशेषांक** पृष्ठ ५३७ ते ५७२

**(११)** विशेषांक अकरावा, **नेट/सेट (दुसरा) विशेषांक** पृष्ठ ५७३ ते ६००.

याशिवाय शिक्षक प्रतिनिधींनी सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची माहिती देणारे १५ विशेषांक 'शब्दयुद्ध विशेषांक' या मथळ्याने त्यावेळेला सन २००१ च्या नुटा बुलेटीन मालिकेमध्ये प्रकाशित करण्यात आले होते. हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. **- डॉ.प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, नुटा**

# 'नुटा बुलेटीन'साठी संगणक आधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा व प्राचार्य प.सि.काणे

**८७.** दिनांक १७ एप्रिल १९९२ रोजी झालेल्या नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत विषय क्रमांक २२ वर नुटा बुलेटीनसाठी संगणक आधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला. *(25-EX-92)* हा निर्णय घेत असतांना त्यासाठीच्या आर्थिक नियोजनाबाबत असे ठरले की, **(i)** अमरावती महानगरपालिकेच्या अनुदान सुत्राबाबत काढलेला विशेषांक (सन १९९१ चे नुटा बुलेटीन पृष्ठ १ ते २०) तसेच नुटा बुलेटीनचा **जलसिंचन अनुशेष विशेषांक** (सन १९९२ चे नुटा बुलेटीन पृष्ठ १ ते ३६) या दोनही विशेषांकाच्या प्रकाशनाच्या वेळी जाहिरातींच्या माध्यमातून संकलित झालेल्या निधीतून प्रत्यक्ष त्या दोनही बुलेटीनच्या प्रकाशनासाठी झालेला खर्च वजा करून उरलेली रक्कम ही या कामी वापरण्यात यावी. *(P97-EX-94)* **(ii)** याशिवाय गरज पडली तर नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सदस्यांनी निश्चित ठरलेला निधी या कामी संघटनेच्या सुपूर्त करावा. **(iii)** एकंदर होणाऱ्या खर्चाचा अंदाज घेऊन सर्व शिक्षकांनी सुद्धा याबाबतीत सहकार्य करण्याविषयी विनंती करावी.

**८८.** हा निर्णय झाल्यानंतर पुढची एक दोन वर्षे या कामामध्ये निघून गेलीत. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये विशेषतः विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये हा एक चर्चेचा मोठा विषय झाला. एकदा अनौपचारिक गप्पांमध्ये प्राचार्य प.सि.काणे यांनी हा विषय काढला. सन १९८८ मध्ये महाराष्ट्र राज्यशास्त्र शिक्षकांची एक परिषद अमरावती येथे झाली होती. त्यावेळेला त्या परिषदेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी आम्ही राज्यशास्त्राच्या अनेक शिक्षकांनी निधीचे आयोजन केले होते. ही परिषद होऊन आता जवळ जवळ ५ ते ६ वर्षांचा काळ होऊन गेला होता. परिषदेसाठी झालेला खर्च वजा जाता अमरावती राज्यशास्त्र मंडळाकडे १०-१२ हजार रुपयांचा निधी पडून होता." अमरावती राज्यशात्र मंडळाच्या वतीने हा निधी "नुटा बुलेटीनसाठी संगणक आधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा" या कामासाठी आपण द्यावा" अशी माझी इच्छा आहे" असे विचार प्राचार्य काणे सरांनी व्यक्त केले. अमरावती राज्यशास्त्र मंडळाची बैठक होऊन तसा निर्णय घेण्यात आला. दिनांक १२ जानेवारी १९९४ रोजी प्राचार्य प.सि.काणे यांनी नुटाच्या कोषाध्यक्षांना एक पत्र पाठवून अमरावती राज्यशास्त्र मंडळाच्या वतीने आपण ११,१०१ रुपयांचा निधी उपरोक्त कामासाठी संघटनेच्या सुपूर्त करीत आहोत असे या पत्रान्वये कळविले. ते संपूर्ण पत्र मी शब्दशः उधृत करीत आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**"From : Principal P.S.Kane,**
Dasera Ground Road, Ravi Nagar, Amravati-444605
No. PS/116 : Date : 12.01.1994

To,
The Treasurer, NUTA, Amravati

Sir,

Please find herewith enclosed a pay order for Rs. 11,101.00 (Rupees Eleven Thousand One Hundred and One only) drawn in your favour. This amount is donated to NUTA by Amravati Rajyashastra Mandal, which had hosted the annual Conference by the Maharashtra Rajyashastra Parishad in 1988 at Amravati and for which the fund was raised by the Local Reception Committee of Amravati Rajyashastra Mandal.

You are requested to accept this donation for NUTA organisation, which is promoting the cause of the University and college Teachers of our region.

The donor of this amount, it should be noted as "Amravati Rajyashastra Mandal" "अमरावती राज्यशात्र मंडळ"

The said donation may be utilized by you in a way your organisation thinks proper to secure the interest of the college and university teachers, preferably in the installation of the D.T.P. system in the NUTA Bulletin Office at Amravati or any related plans to make the communicative system more efficient and more effective.

Thanking you.

Yours Sincerely

(Prof. Ram Kakani) (P.S.Kane)
Local Secretary Local President
1988 Maharashtra Rajyashastra Parishad Amravati

Copy to : Prof.B.T.Deshmukh, President, NUTA with compliments."

**८९.** नुटाच्या कार्यकारी मंडळाने ही देणगी स्वीकारण्याचा व त्याबद्दल अमरावती राज्यशास्त्र मंडळाचे आभार मानणारा ठराव संमत केला. ही यंत्रणा स्थापित करण्याची तयारी जवळ जवळ पूर्ण झालेली होती. रविवार, दिनांक १५ जानेवारी १९९५ या दिवशी ती यंत्रणा उद्घाटित करावी असे कार्यकारी मंडळाने ठरविले. उद्घाटनासाठी प्राचार्य प.सि.काणे यांना मुख्य पाहुणे म्हणून बोलाविण्यात यावे असाही निर्णय कार्यकारी मंडळाने घेतला. कार्यकारी मंडळाने संमत केलेली या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका पुढीलप्रमाणेः-

"NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION *I have the honour to invite all the members of the Executive Committee of NUTA on the occasion of Formal* INAUGURATION of the D.T.P. Unit installed in NUTA Office **at Amravati.** *on Sunday the 15th January 1995 at 10.30 a.m.* **Prin. P.S.Kane has kindly consented to be the Chief guest on this occasion.** Prof. B.T.Deshmukh, *President NUTA* will preside. You are requested to attend the function. Thanking you, E.H.Kathale Secretary, NUTA"

**९०.** संगणकाची ही यंत्रणा व त्याची हाताळणी ही आम्हा सर्वांसाठी त्यावेळी नवीनच होती. पुरेसा मोठा समारंभ करून पुढे लहानसे सुद्धा काम न होण्याच्या भितीतून लहानसा समारंभ करून पुरेसे काम करण्याच्या रीतीचा आश्रय घ्यावा असे ठरले. नुटाच्या फक्त कार्यकारी मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत रविवार, दिनांक १५ जानेवारी १९९५ रोजी या यंत्रणेचे औपचारिक उद्घाटन झाले. उद्घाटक गुरुवर्य प्राचार्य प.सि.काणे यांनी संगणकाची कळ दाबताच बाहेर पडलेले पहिले पृष्ठ म्हणजे सन १९९५ च्या EX-file चे पृष्ठ क्रमांक १४ होय. हे पृष्ठ जसेच्या तसे आजच्या अंकात सर्वांच्या माहितीसाठी पृष्ठ ११६ वर पुनर्मुद्रित केले आहे.

## नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका

'नुटा बुलेटीन'च्या प्रकाशनाला ५० वर्षे पूर्ण होत आलेली आहेत. नुटा बुलेटीन सुवर्ण जयंती विशेषांक मालिकेचे प्रकाशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत प्रकाशित करण्यात आलेले विशेषांक पुढीलप्रमाणे आहेत. :-

**(१)** विशेषांक पहिला, **"तद् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः" "सतत प्रश्न विचारित राहणे विशेषांक"** पृष्ठ १ ते ८

**(२)** विशेषांक दुसरा, **संगणक शास्त्र या विषयाला दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे निर्मूलन - विशेषांक** पृष्ठ ९ ते २८

**(३)** विशेषांक तिसरा, **अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करीत राहण्याचा उद्योग हाणून पाडणे - विशेषांक** पृष्ठ ३७ ते ६०

**(४)** विशेषांक चौथा, **युजीसी ड्राफ्ट रेग्युलेशन - विशेषांक** पृष्ठ ६१ ते ९२

हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. **- डॉ.प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, नुटा**

*'नुटा बुलेटीन'साठी बुलेटीन कार्यालयामध्ये उभारण्यात आलेल्या संगणकाधारित प्रकाशनपूर्व यंत्रणेचे औपचारिक उद्घाटन १५ जानेवारी १९९५ रोजी झाले. त्यावेळी बाहेर आलेले प्रथम पृष्ठ*

***NUTA-1995-EX-14***

**OFFICE OF THE NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
**Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati,**

*ही आहे आमच्या संघटनेच्या कार्यालयातील*

**मुद्रण व्यवस्था**

*रविवार दिनांक १५ जानेवारी १९९५ रोजी नुटाच्या कार्यकारी मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत*

*उद्घाटीत झाली सकाळी १०.३० वाजता*

**प्राचार्य प.सि.काणे,**

*यांच्या हस्ते.*

*समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते नुटाचे अध्यक्ष*

**प्रा. बी.टी.देशमुख**

*मुद्रण ही प्रगत अवस्थेला पोहचलेली जगातील अतिशय संपन्न कला आहे आणि इतर अन्य कलांप्रमाणेच मुद्रण कलेशी मानवी जीवनाचा अनेक शतके अतूट संबंध जोडल्या गेला आहे. काळाच्या ओघात कला लुप्त होऊ नयेत म्हणून त्यांना शाश्वत स्वरूप देण्यात येते ते येथेच. मुद्रणस्थळ हे आहे शस्त्रागार अफवांच्या कुजबुजीपासून निर्भय सत्याचे संरक्षण करणारे. येथून शब्द सर्व जगभर संचार करू शकतात.*

चार भिंतींच्या आत चाललेल्या कारस्थानांना प्रकाशात खेचून आणता येते ते मुद्रित शब्दांच्या आधारानेच. आमच्या सेवाशर्तीवर हल्ला चढविणारे १९७३ चे "कॉलेज कोड नव्याने येऊ घातलेले" हाणून पाडण्यात आम्हाला केवढी मदत झाली त्या मुद्रित शब्दांची ! ७३ ची वेतनश्रेणी लागू करताना शासनाने केलेल्या अन्यायाच्या निवारणार्थ "प्राध्यापक रस्त्यावर कां आले" हे सांगण्यासाठी आम्ही शस्त्र म्हणून वापरले ते मुद्रित शब्दच ना ? १९७४ च्या विद्यापीठ कायद्यातील प्रतिकूलता काढून टाकण्यासाठी "नवे विद्यापीठ विधेयक" या मुद्रित शब्दांची मदत घ्यावी लागली आम्हाला

**तहान लागल्यावर विहीर खणण्याच्या या प्रकारातून जन्म झाला नुटा बुलेटीनचा आणि आमच्या व्यावसायिक सुखदु:खांच्या सर्व क्षणी आम्हाला मनोभावे साथ दिली नुटा बुलेटीन मधल्या त्या मुद्रित शब्दांनी. आज त्या शब्दांना आधार मिळाला आहे या संगणकांचा.**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 08.04.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.04.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,........................................................................

........................................................................

........................................................................

........................................................................